नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १६७ * * अमरावती * शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## दिल्ली हायकोर्टाकडून लोकपालांचा आदेश रद्द



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :
पैसे घेऊन संसदेत प्रश्न विचारल्याच्या प्रकरणात उइक सध्या टीएमसी खासदार महुआ मोइत्रा यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करणार नाही. दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी लोकपालने आरोपपत्र दाखल करण्यास दिलेली मंजुरी रद्द केली आहे.

न्यायमूर्ती अनिल क्षतरपाल आणि हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने लोकपालला सांगितले आहे की त्यांनी लोकपाल आणि लोकायुक्त अधिनियमच्या कलम २० अंतर्गत एका महिन्याच्या आत कायद्यानुसार पुन्हा निर्णय घ्यावा.

अग्रलेख

## खरीखरी..

## माणिकरावांना दिलासा

आज मुंबई उच्च न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना दिलासा दिला. कालच्या दोन्ही कोर्टातील म्हणजेच नाशिकच्या न्याय दंडाधिकारी आणि जिल्हा सत्र न्यायालय या दोघांनीही वस्तुस्थिती विचारात घेतलीच नाही असे कोकाटे यांच्या वकिलांचे म्हणणे रास्तच आहे. ज्यावेळी विशिष्ट कोट्यातील ही सदनिका घेण्यात आली, त्यावेळी दाखवलेले उत्पन्न खोटे नव्हते मात्र पुढे उत्पन्न वाढले आणि मग संबंधितांनी पाठपुरावा करून कोर्टात खटला दाखल केला. माणिकराव कोकाटे यांनी सुरुवातीला हे प्रकरण गंभीरतेने घेतले नाही असे आमचे निरीक्षण आहे, कोकाटे यांच्याबाबत आम्ही जे जाणतो ते एवढेच आहे की, ही व्यक्ती कोणत्याही प्रकारच्या भानगडीत गुंतलेली नाही. कृषिमंत्री पदाचा कारभार असताना किती मोठी उलाढाल होते, हे आम्ही सांगण्याची गरज नाही यापूर्वीची अनेक उदाहरणे याची साक्ष आहेत. एखाद्या मंत्र्याबद्दल संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक बोलावे एवढा चांगला कारभार माणिकरावांचा होता. पोटात एक आणि ओठात दुसरे असे त्यांना करता येत नाही हा त्यांचा अवगुण अथवा गुण असावा पण म्हणून किरकोळ आरोपामुळे अनेक वर्तमानपत्रांनी माणिक रावांना खलनायक म्हणून दाखवण्यास कमी केले नाही. आम्हाला एकच म्हणायचे आहे कोणतीही बातमी देताना किंवा मत व्यक्त करताना पूर्वपिठीका जाणूनच मत व्यक्त केले पाहिजे. अनेक तथाकथित बड्या बड्या वृत्तपत्रांनाही हे पथ्य पाळता आले नाही ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. माणिकराव गेल्या अनेक दिवसांपासून अबोल आहेत, मंत्री म्हणून आपले काम उत्तम रीतीने ते करीत होते पण या किरकोळ खटल्यापूर्वी त्यांना जो मनस्ताप झाला आहे त्याला हवा देण्याचे काम अनेक बोरू बहाद्दरांनी केले ही आमची ही खंत आहे. देशातील अनेक सवलती खोटे दाखले देऊन मिळवण्यात येतात. मुख्यमंत्र्यांच्या कोट्यातील घरे ज्यांना ज्यांना मिळाली त्यांची सगळ्यांची चौकशी करायचे ठरवले तर अनेक बडे मासे गळाला सहज लागू शकतात. जो माणूस एका मतदारसंघातून अनेक वेळा निवडून येतो त्याच्याबद्दल संपूर्ण जनतेचे चांगले मत असल्याशिवाय जनता त्यांना मत देईल काय, याचाही सगळ्यांनी विचार केला पाहिजे. आज या प्रकरणाचा स्वल्पविराम आलेला आहे आता नैतिकता म्हणून माणिक रावांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामाही दिलेला आहे. राजीनाम्यासाठी त्यांना थांबताही आले असते, खरे पाहिले तर देशात अशी अनेक उदाहरणे आहेत पण आपल्या पक्षनिष्ठेला अनुसरून पक्षाची बदनामी होऊ नये यासाठी त्यांनी दिलेल्या राजीनामा हे चांगले पाऊल आहे. आता ज्यांनी ज्यांनी त्यांचा राजीनामा मागितला होता, त्यांनी त्यांनी न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांना परत मंत्रिमंडळात घ्यावे अशी मागणी केली पाहिजे. देशातील अनेक मंत्री यापेक्षा दहापट गंभीर अपराधाखाली न्यायालयग्रस्त आहेत पण ते मस्त आहेत आणि सत्ता भोगत आहेत. वयाचा खोटा दाखला देऊन बिहारचे उपमुख्यमंत्री ताठ मानेने आपले पद भोगीत आहेत. एकूणच या प्रकरणाची बेरीज वजाबाकी केल्यावर असे लक्षात येते की, आता राजकारण छक्के-पंजे केल्याशिवाय करता येत नाही. न्यायालयात तारखांवर तारखा घेणारे कित्येक महाभाग छानपैकी पदोपभोग घेत आहेत आम्हाला माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल जी काही माहिती मिळाली, त्याच्या आधारे आम्ही त्यांना जसे ओळखले तशाप्रकारेच लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते जर खरोखरच दोषी असते, तर उच्च न्यायालयाने त्यांना दिलासा दिला असता काय. आम्ही या सर्व बाबतीत राजकारण होऊ नये या मताचे आहोत कारण हा सर्व प्रकार अतिशय जीवघेणा आहे अशा गोष्टींमुळे प्रामाणिक माणसांना प्रचंड मनस्ताप होऊ शकतो. यामुळेच हे प्रकरण अधिक चिघळू नये आणि आमच्या लेखणी बहाद्दरांनी उगाच चघळू नये, एवढेच आम्हाला सांगावयाचे आहे. आजच्या निकालामुळे माणिक रावांना मिळालेला दिलासा भविष्यातही कायम राहावा, असे आम्हाला वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# बुटीबोरीच्या अवाडा कंपनीत मृत्यूचे तांडव

# सहा कामगार ठार

तपासणीदरम्यान पाण्याच्या टाकीचा भीषण स्फोट

९ जखमी

३ अत्यवस्थ





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/हिंगणा, दि. १९ :
नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात आज (शुक्रवारी, १९ डिसेंबर) दुपारी अत्यंत भीषण दुर्घटना घडली. येथील 'अवाडा' या सौर पॅनेल निर्मिती करणाऱ्या कंपनीत पाण्याचा टँक टॉवर अचानक कोसळल्याने सहा कामगारांचा मृत्यू झाला, तर अनेक कामगार ढिगाऱ्याखाली दबले गेल्याने गंभीर जखमी झाले आहेत.

अवाडा कंपनीमध्ये सध्या सौर पॅनेल निर्मिती आणि विस्तारीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ज्या ठिकाणी हे काम सुरू होते, त्याच परिसरात पाण्याची एक मोठी टाकी उभी होती. शुक्रवारी दुपारी कामगार या टाकीच्या खालील भागात बांधकामात व्यस्त असताना अचानक हा अजस्त्र टॉवर कोसळला. टॉवरचा मोठा भाग आणि पाण्याचा प्रचंड दाब यामुळे तिथे काम करणाऱ्या मजुरांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासन आणि एमआयडीसी अग्निशमन दलाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ढिगाऱ्यात अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले.

या दुर्घटनेत जखमी झालेल्या १२ कामगारांना तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काहींची प्रकृती चिंताजनक आहे.

आमचे हिंगणा प्रतिनिधी राजेंद्र सांभारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी ११:३० च्या सुमारास कंपनीत नवनिर्मित मेटॅलिक वॉटर टँकची चाचणी (हायड्रो टेस्टिंग) सुरू होती. दीड लाख लिटर पाण्याचा दाब पेलण्याची क्षमता तपासली जात असताना पाण्याच्या प्रचंड दाबाने टाकीचा स्फोट झाला आणि आसपास काम करणाऱ्या ६ कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर ३ जण रूग्णालयात दगावले. अन्य ९ कामगार जखमी असून त्यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे.

या घटनेत सुधांशु साहणी (३६), बुलेटकुमार सहा (३०), शमीम अन्सारी (४२) यांचा जागीच मृत्यू झाला तर अरविंद कुमार ठाकुर (२८), अशोक कंचन पटेल (४२) आणि अजय राजेश्वर पासवान (२६) या तिघांचा उपचारादरम्यान रूग्णालयात मृत्यू झाला. सर्व मृतक बिहारच्या मुजफ्फरपूर जिल्ह्यातील रहिवासी होते. प्रकाश सहाणी, अन्वर अन्सारी व मुक्तार अन्सारी हे गंभीर जखमी आहेत.

इतर जखमींमध्ये बाबूचंद प्रसाद मुन्नर, जाकीर हुसैन, इब्राहिम अन्सारी, विकासकुमार सहानी, संतोष गौतम आणि नागपूरची मयुरी तुरक यांचा समावेश आहे.

दरम्यान, अवाडा कंपनीत याआधीही एका कामगाराचा फोर्कलिफ्टखाली चिरडून मृत्यू झाला होता. या कंपनीत सुरक्षा ऑडिटचे काय झाले? मागील घटनेनंतर कंपनीवर कोणतीही ठोस कारवाई का झाली नाही? चाचणीवेळी निष्काळजीपणा का? इतक्या मोठ्या क्षमतेच्या टाकीचे टेस्टिंग करताना सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले होते का? वारंवार अपघात होऊनही प्रशासन ढिम्म का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

### पोट भरायला आले अन्

मृत्यूमुखी पडलेले सुधांशु साहणी, बुलेटकुमार सहा आणि शमीम अन्सारी हे सर्व बिहारमधील गरीब कुटुंबातील होते. हजारो मैल दूर नागपुरात ते केवळ आपल्या कुटुंबाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी आले होते. त्यांच्या घरी आता त्यांचे 'पार्थिव' पोहोचणार आहे. साहब, हम कमाने आये है, जान गँवाने नही, असे आता बिहारमधून येथे आलेले अन्य कामगार बोलू लागले आहेत.

## कोकाटेंची तुरुंगवारी टळली

### हायकोर्टाकडून १ लाखाचा जामीन मंजूर : शिक्षेला स्थगिती नाही



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून त्यांचे क्रीडा खाते काढून घेण्यात आले असून आता त्यांचा राजीनामा देखील स्वीकारण्यात आला आहे.

माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यात त्यांना एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला. मात्र, ते दोषी असल्याचे कोटाने मान्य करत त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांची तुरुंगवारी तूर्तास टळली आहे. परंतु, त्यांच्या आमदारकीवरची टांगती तलवार कायम आहे.

मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाली असून यावेळी दोन्ही पक्षांचा जोरदार युक्तिवाद होत असल्याचे समजते. तसेच कोकाटे यांचे वकील रवींद्र कदम यांनी कोकाटे यांना सोमवार किंवा मंगळवारपर्यंत दिलासा द्यावा, अशी मागणी केली असल्याचे समजते. तर सरकारी वकिलांनी म्हटले की कोकाटे यांना न्यायालयाकडून अटक वॉरंट जारी झाला असूनही कोकाटे सरेंडर झाले नसल्याचे म्हटले आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती लड्डा यांच्यासमोर सुरू आहे.

रवींद्र कदम यांनी माणिकराव कोकाटे यांची बाजू मांडताना म्हटले की, घर मिळाल्याची तारीख आणि घर घेतल्यानंतरची आर्थिक परिस्थिती बदलत असते. यावर पीडब्ल्यूडीने काय क्रॉस एक्झॅमिनेशन केले आहे तेही बघून घ्या, अशा सूचना कोर्टाने दिल्या आहेत. तसेच कदम यांच्याकडून कोकाटे यांची आर्थिक परिस्थिती कशी बदलली आहे याचे जुने आणि नवे संदर्भ मांडण्यात आले आहेत.

फसवणुकीच्या प्रकरणात देखील माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरवले आहे. यावर बोलताना रवींद्र कदम यांनी कोर्टात म्हटले की, कोणी स्वतःच्याच सहीची बनावट सही करेल का? कोकाटे यांनी बनावट रेशन कार्ड बनवल्याचा आरोप करण्यात आला होता. यावर कदम यांनी युक्तिवाद केला आहे. तसेच कोकाटे यांच्यावर लागलेल्या शिक्षेच्या कलमाचे रवींद्र कदम यांच्याकडून विश्लेषण करण्यात आले. सुनावणीच्या वेळी माणिकराव कोकाटे यांचे आणखी एक वकील अनिकेत निकम यांनीही बाजू मांडली. अखेरर न्यायालयाने आपला निकाल सुनावला.

## विकासासाठी भाजप, भावना मात्र गांधी कुटुंबाशीच!



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
काँग्रेसमधून बाहेर पडत भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रज्ञा सातव यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना विकास हाच पक्षबदलामागचा एकमेव हेतू असल्याचे सांगितले आहे. भाजपमध्ये प्रवेश केला असला तरी राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्याबद्दल मनात अपार आदर असल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

काँग्रेस पक्षाने दोन वेळा विधानपरिषदेत जाण्याची संधी दिली, त्यामागे राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांचा मोठा वाटा असून ते दोघे आजही आपल्यासाठी दैवतासमान असल्याचे प्रज्ञा सातव म्हणाल्या.

काँग्रेसच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रज्ञा सातव यांनी हिंगोली येथे भाजप नेते मुटकुळे यांच्या कार्यालयाला भेट दिली. यानंतर त्यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना काँग्रेस सोडण्यामागील कारणांवर सविस्तर भाष्य केले. त्यांनी सांगितले की, भाजप कार्यकर्त्यांनी आपले आणि आपल्या कुटुंबाचे अत्यंत प्रेमाने स्वागत केले असून, या प्रतिसादामुळे आपण भावूक झालो आहोत. येत्या काळात राजूभाऊंचे स्वप्न साकार करण्यासाठी एकत्र काम करणार आहे.

## युवराज सिंग, सोनू सूद यांची मालमत्ता जप्त

सट्टेबाजी प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
अंमलबजावणी संचालनालयाने शुक्रवारी सट्टेबाजी प्रकरणात माजी क्रिकेटपटू युवराज सिंग, बॉलिवूड अभिनेता सोनू सूद, अभिनेत्री नेहा शर्मा यांच्यासह अनेक सेलिब्रिटींची मालमत्ता जप्त केली आहे.

अभिनेत्री उर्वशी रौतेलाची आई, बंगाली अभिनेता अंकुश हाजरा, रॉबिन उथप्पा यांच्यासोबतच माजी टीएमसी खासदार मिमी चक्रवर्ती यांच्या मालमत्ताही ईडीने जप्त केल्या आहेत. जप्त मालमत्तांची किंमत १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे सांगितले जाते.

## दुसऱ्या मंत्र्याचीही विकेट पडणार..

उद्धव ठाकरेंचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारच्या आणकी एका मंत्र्यावर राजीनाम्याची टांगती तलवार असल्याचा दावा केला आहे.

कालच एका मंत्र्याचा राजीनामा झाला. आणखी एक मंत्री जायच्या वाटेवर आहे. पण मुख्यमंत्री त्याच्यावर पांघरून घालत आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे हा दुसरा मंत्री कोण? याविषयी चर्चा रंगली आहे.

महापालिका निवडणुकांच्या तोंडावर ठाकरे गटातील इनकमिंग वाढली आहे. आजही मुंबई व उपनगरासह छत्रपती संभाजीनगर येथील कार्यकर्त्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला.

यावेळी बोलताना ठाकरे म्हणाले, कालच एका मंत्र्याचा राजीनामा झाला आहे. आणखी एक मंत्री जायच्या वाटेवर आहेत. परंतु, मुख्यमंत्री त्यांना पांघरूण घालत आहेत, हे विचित्र आहे. उद्धव ठाकरे यांनी यावेळी एकनाथ शिंदेंचे नाव न घेता ड्रग्ज व्यवहाराचा उल्लेख करीत त्यांच्यावरही निशाणा साधला.

## सातारा ड्रग्स प्रकरणी ठाकरे गट आक्रमक

प्रियंका चतुर्वेदीचे अमित शहांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
सातारा जिल्ह्यातील सावरी गावातील एका शेडवर मुंबई पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात ४५ किलो ड्रग्स साठा जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाला आता राजकीय वळण लागले असून, शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित रिसॉर्ट हे कोयना धरणाच्या प्रतिबंधित क्षेत्राजवळ असून ते बेकायदेशीर असल्याचा आरोपही पत्रात करण्यात आला आहे.

## बांगलादेशात पुन्हा उफाळला हिंसाचार

### न्यूज चॅनल्ससह अवामी लीगचे ऑफिस जाळले

■ वृत्तसंस्था, ढाका, दि. १९ :
१२ डिसेंबर रोजी डोक्यात गोळी झाडून मारण्यात आलेले नेते उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर बांगलादेशातील अनेक शहरांमध्ये हिंसाचार उसळला आहे. बांगलादेशमध्ये शेख हसीना यांचे विरोधक नेते उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर हिंसाचार भडकला आहे. गुरुवारी रात्री उशिरा आंदोलकांनी देशातील सर्वात मोठे वृत्तपत्र 'डेली स्टार' आणि 'प्रोथोम आलो' यांच्या कार्यालयात जबरदस्तीने घुसून तोडफोड आणि जाळपोळ केली. याशिवाय, माजी राष्ट्रपती शेख मुजीबुर्रहमान यांच्या निवासस्थानाचीही तोडफोड करण्यात आली आहे आणि शेख हसीना यांच्या 'अवामी लीग' पक्षाचे कार्यालयही जाळण्यात आले आहे.

उस्मान हादी हे जुलै २०२४ मध्ये शेख हसीना यांच्या विरोधात झालेल्या विद्यार्थी आंदोलनातील प्रमुख नेत्यांपैकी एक होते. १२ डिसेंबर रोजी निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या डोक्यात गोळी मारण्यात आली होती. त्यानंतर त्यांना चांगल्या उपचारासाठी सिंगापूरला नेण्यात आले होते. सहा दिवसांनंतर त्यांचा मृत्यू झाला.

बीबीसी बांगलाच्या वृत्तानुसार, बांगलादेशात धर्माचा अपमान केल्याच्या आरोपावरून एका हिंदू तरुणाला मारहाण करून ठार मारण्यात आले. त्यानंतर त्याचा मृतदेह नग्न करून एका झाडाला लटकवून जाळण्यात आला. पोलिसांनी मृताची ओळख दीपू चंद्र दास अशी केली आहे.

ही घटना गुरुवारी रात्री भालुका येथे घडली. सोशल मीडियावर याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यात लोक 'अल्लाह-हू-अकबर'च्या घोषणा देताना दिसत आहेत.

## द. आफ्रिकेला २३२ धावांचे लक्ष्य



■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १९ :
टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी २३२ धावांचे लक्ष्य दिले. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने २० षटकांत ५ गडी बाद २३ धावा केल्या.

पंड्याने १६ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. भारतीय संघाकडून हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक आहे. युवराज सिंगच्या नावावर भारतीय संघाकडून सर्वात जलद अर्धशतक (१२ चेंडू) करण्याचा विक्रम आहे.

१३ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर कर्णधार सूर्यकुमार यादव (५ धावा) कॉर्बिन बॉशच्या चेंडूवर डेव्हिड मिलरच्या हाती झेलबाद झाला. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात अभिषेक शर्मा (३४ धावा) कॉर्बिन बॉशकरवी झेलबाद केले. संजू सॅमसन (३७ धावा) जॉर्ज लिंडेने झेलबाद केले.



# अनिल परबांनी घेतली राज ठाकरेंची भेट



**मुंबई :** महाराष्ट्रात महापालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून सर्वच राजकीय पक्षांनी मोचेबांधणी सुरू केली आहे. सर्वात महत्त्वाची आणि श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेकडे सर्वच पक्षांची नजर आहे. विशेषतः शिवसेना ठाकरे गट, शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांनी मुंबईत आपली ताकद वाढवली असून मुंबई महापालिकेवर आपल्याच पक्षाचा महापौर बसवण्याचा निर्धार या पक्षांनी केला आहे. यात आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गटाची युती होणार असल्याची शक्यता वर्तवली जात असून ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी राज ठाकरे यांच्या भेट घेतली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित झाल्यापासूनच ठाकरे बंधूंच्या भेटी-गाठी वाढल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच आता अनिल परब यांनी राज ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली आहे. या भेटीत मनसे-ठाकरे गटाच्या युतीच्या घोषणेबाबत चर्चा झाली असल्याचे बोलले जात आहे. तसेच जागावाटप होत नाही, तोपर्यंत युतीची घोषणा नाही, असे ठरले असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे युतीची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. अनिल परब यांनी शिवतीर्थ येथे राज ठाकरे यांची भेट घेत युती संदर्भात चर्चा केल्यानंतर मनसे नेते नितीन सरदेसाई यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, युतीची चर्चा अंतिम टप्प्यात आली आहे आणि त्या पद्धतीने सगळ्यांचे काम सुरू आहे. युती संदर्भात ज्या काही चर्चा सुरू आहेत, त्यासाठी या भेटी-गाठी सुरू राहणारच. युती कधी जाहीर होईल हे आत्ताच सांगणे कठीण आहे. युतीची चर्चा अंतिम टप्प्यात आहे आणि राज ठाकरे तुम्हाला याबाबतीत माहिती देतील. तसेच चांगल्या वातावरणात ही चर्चा सुरू आहे एवढे मी सांगू शकतो, अशी प्रतिक्रिया सरदेसाई यांनी दिली आहे.

# भारताला विश्वगुरू होण्याची क्षमता : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**

प्राचीन भारत हा जगातील सर्वाधिक प्रगत आणि आर्थिक महासत्ता असणारा देश होता. भारतातील ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीमुळे देश जगात आघाडीवर होता. या प्राचीन ज्ञानाची आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी प्रभावी सांगड घातल्यास भारत पुन्हा एकदा विश्वगुरू होऊ शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




वांद्रे-कुर्ला संकुलातील ग्रँड हयात येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर के पी ग्लोबलचे अध्यक्ष राजेश शर्मा, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक अध्यक्ष स्वामी विद्यानंद, जे एस डब्ल्यू ग्रूपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल आयटी मंत्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक शैलेश त्रिवेदी उपस्थित होते.

इनव्हेशन, सेल्फ रिलायन्स अँड प्रोस्पेरिटी (शोध, स्वावलंबन आणि समृद्धी) या देशाच्या विकासदिशा ठरविणाऱ्या संकल्पनेवर या मंचावर मंथन होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हिंदू ही केवळ धर्मव्यवस्था नसून जीवनपद्धती व विचारप्रणाली आहे. हजारो वर्षांपासून ही परंपरा जिवंत आहे. अनेक प्राचीन संस्कृती लुप्त झाल्या; मात्र सिंधू-हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. पुराव्यांवर सिद्ध झालेले हे सांस्कृतिक सातत्य दहा हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे दर्शवते. भारत हा नवनिर्मितीचा मूळ स्रोत आहे. खगोलशास्त्र व भूगोलासारखी शास्त्रे प्राचीन काळात भारतात अत्यंत प्रगत होती. वेद आणि वेदपूर्व साहित्यामध्ये त्याची साक्ष आढळते. जगात आता पाचवी औद्योगिक क्रांती सुरू असून ही क्रांती डिजिटायजेशनमुळे होत आहे. तसेच एआय आणि डाटा या क्षेत्राला या क्रांतीमध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. यासाठी लागणारे उत्पादन महत्वाचे आहे. उत्पादन क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे कणा आहे. इनोव्हेशनचे मूळ उत्पादनातच आहे आणि या क्रांतीचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताकडे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा क्षेत्रात भारत आघाडीवर असून २०३० पर्यंत जगातील सर्वाधिक डेव्हलपर्स भारतीय असतील, असे मायक्रोसॉफ्टचे प्रमुख सत्य नाडेला यांनीही नमूद केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. एआयमुळे उद्योगांमध्ये आमूलाग्र बदल होत असून या इनोव्हेशनमध्ये नेतृत्व करण्याची क्षमता भारतात आहे.

आत्मनिर्भर भारत या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, १४० कोटी लोकसंख्येचा देश आत्मनिर्भर बनणे अत्यावश्यक आहे. स्वदेशी म्हणजे देशातच उत्पादन, भारतीय कंपन्यांमार्फत तंत्रज्ञानाचा विकास करण्यात येत आहे. चीनने जपानचे तंत्रज्ञान वापरले, त्याचे रिव्हर्स इंजिनिअरिंग केले. पण भारतात तंत्रज्ञान समजून घेऊन आत्मनिर्भर होण्याची क्षमता आहे. तंत्रज्ञानाला आज असलेले महत्व ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेक क्षेत्रात तंत्रज्ञान हस्तांतरणाची अट घातली आहे.

श्री.फडणवीस म्हणाले, जगाचा चीनवरील विश्वास त्यांच्या विस्तारवादी धोरणांमुळे कमी झाला असताना भारताच्या नेतृत्वावर आणि संस्कृतीवर जागतिक विश्वास वाढत आहे. आफ्रिकेमध्ये विकासाच्या नव्या संधी असून, त्या संधींमध्ये जो देश सक्रिय सहभाग घेईल तोच जागतिक नेतृत्व करेल. भारत आणि आफ्रिकी देशांमधील संबंध दृढ असून अनेक आफ्रिकी देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना आपला नेता मानतात.

मुंबईत लवकरच ५४ आफ्रिकी देशांना होस्ट करणारी एक भव्य इमारत उभारली जाणार आहे. उद्योजकांनी आफ्रिकेकडे लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. आफ्रिकेत नैसर्गिक साधनसंपत्ती प्रचंड असून नव्या तंत्रज्ञानासाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध आहे. आफ्रिकेत उत्पादन सुरू झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल होईल आणि त्याचे नेतृत्व भारत करेल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

पापुआ न्यू गिनीच्या शिष्टमंडळाने गॅस उत्खननासाठी भारताला निमंत्रण दिल्याचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही सर्व संधी भारताच्या प्राचीन परंपरेतून आलेल्या जागतिक विचारांचे फलित आहे. विचारांच्या बळावर जग जिंकण्याची ही परंपरा आहे. हे सर्व जोडण्याचे काम वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारखे मंच करू शकतात. जागतिक व्यापारात २० टक्के वाटा मिळवण्याचे स्वप्नही या व्यापक दृष्टिकोनातून साकार होऊ शकते. दरम्यान, श्री सिमेंटच्या बांगर ग्रुपने राज्यातील चंद्रपूर येथे २,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठीचे इंटेंट लेटर मुख्यमंत्री फडणवीस यांना मंचावर सादर केले. ही गुंतवणूक म्हणजे राज्याच्या विकासावर दाखवलेला विश्वास आहे.

स्वामी विद्यानंद म्हणाले की, या फोरमचा उद्देश देशाचा विकास हा आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला आर्थिक सक्षम बनवणे म्हणजे खरा विकास आहे. यासाठी सर्वांनीच आर्थिक विकासात सहभागी होणे गरजेचे आहे.

### मुख्यमंत्री स्वतः तपास अधिकारी झाले काय?
# ठाकरे गटाचा सवाल



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सातारा ड्रग्ज प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या क्लीनचिटवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. साताऱ्यात सरकारच्या आशीवार्दाने ड्रग्जचा धंदा सुरू होता. पण मुख्यमंत्री कोणत्याही तपासाशिवाय स्वतःच क्लीनचिट देत आहे. ते स्वतःच तपास अधिकारी झालेत की काय? असा संतप्त सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सातारा ड्रग्ज प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर होणारे आरोप जोरकसपणे फेटाळून लावलेत. प्रस्तुत प्रकरणात आतापर्यंत हाती लागलेल्या पुराव्यांमध्ये एकनाथ शिंदे किंवा त्यांच्या कुटुंबाचा कोणताही संबंध दुरान्वयेही आढळला नाही. त्यामुळे त्यांच्यावर होणारे आरोप चुकीचे व निषेधार्ह आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे यांनी त्यांच्या या क्लीनचिटवर जोरदार हरकत घेतली आहे. तसेच या सरकारच्या मंत्र्यांवर सातत्याने भ्रष्टाचाराचे डाग लागत असल्याचा आरोप केला आहे.

# दुहेरी हत्याकांडाने कोल्हापूर हादरले

## वडिलांच्या डोक्यात दगडाने वार करत घेतला जीव, आईच्या हाताची नस कापत निर्घृण हत्या

■ **महासागर प्रतिनिधी**
**कोल्हापूर, दि. १९ :**

कोल्हापूर जिल्ह्यातील हुपरी येथे एकुलत्या एक मुलाने आपल्या जन्मदात्या आई-वडिलांची हत्या केल्याची उघडकीस आले आहे. हुपरी शहरातील महावीर नगर परिसरात पहाटेच्या सुमारास ही घटना घडल्याचे समजते. घराच्या वाटणीच्या वादातून हा भयंकर प्रकार घडला असून हत्या केल्यानंतर आरोपीने स्वतःहून पोलिस ठाणे गाठत आपण केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. या घटनेने हुपरी शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजयमाला नारायण भोसले (70) आणि नारायण गणपतराव भोसले (78, रा. महावीर नगर, अल्फालाइन गल्ली, हुपरी) या दाम्पत्याचा जन्मदात्या मुलाने अत्यंत थंड डोक्याने व अत्यंत निर्घृणपणे खून केला आहे. या दुहेरी हत्ये प्रकरणी त्यांचा मुलगा आरोपी सुनील नारायण भोसले (48) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेसंदर्भात हुपरी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील भोसले गेल्या काही महिन्यांपासून घरवाटणीच्या मागणीवरून आई-वडिलांशी सतत वाद घालत होता. तसेच घराच्या वाटणीला आई-वडिलांनी विरोध केला होता. आई वडिलांनी घराची वाटणी नाकारल्याने वैतागलेल्या सुनीलने शुक्रवारी पहाटे साधारण साडेपाचच्या सुमारास आपल्या आई वडिलांची हत्या केली.

### आईच्या हाताची नस कापली

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात असे दिसून आले की, पहाटेच्या सुमारास सुनीलने झोपलेल्या वडिलांच्या डोक्यावर आधी काठीने वार केला त्यानंतर दगडाने जोरदार प्रहार केला. त्यानंतर खिडकीची काच फोडून त्यांच्या हाताची नस कापली. या हल्ल्यात वडिलांचा जागीच मृत्यू झाला. तेवढ्यात घरात प्रवेश करत असलेल्या आई विजयमाला यांच्या डोक्यातही काचेच्या तुकड्याने घाव घातला तसेच आईच्याही हाताची नस कापली. त्यामुळे त्यांचाही जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर सुनील थंड डोक्याने घराच्या बाहेर आला आणि त्यानंतर त्याने हुपरी पोलिस ठाणे गाठले. इथे त्याने पोलिसांसमोर आपण केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

पोलिस निरीक्षक एन.आर. चौखंड, सहाय्यक निरीक्षक विक्रम शिंदे यांच्यासह पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच फॉरेन्सिक विभागाच्या तज्ज्ञांनी घटनास्थळी पोहोचून ठसे, शस्त्र, रक्ताचे नमुने आणि काचेचे तुकडे व इतर पुरावे संकलित केले. दोघांच्याही मृतदेहांना शवविच्छेदनासाठी कोल्हापुरातील सीपीआर रुग्णालयात हलवण्यात आले. तसेच सुनील भोसलेची सखोल चौकशी सुरू करण्यात आली असून त्याने हत्या नेमकी कशी केली तसेच त्यामागे कोणते कौटुंबिक व सामाजिक कारण होते का, याचा तपास पोलिस करत आहेत.

# हॉटेल कावेरीच्या मालकावर गोळीबार

■ **महासागर प्रतिनिधी**
**अहिल्यानगर, दि. १९ :**

अहिल्यानगर येथील हॉटेल कावेरीच्या मालकावर झालेल्या गोळीबाराप्रकरणी एक नवा खुलासा झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे बोट दाखवले आहे. या प्रकरणी त्यांनी राम शिंदे व त्यांच्या एका सहकाऱ्याचा फोटो व व्हिडिओ सार्वजनिक करत जामखेडमध्ये गुंडगिरीला कोण पोसतंय? असा सवाल मुख्यमंत्र्यांना केला आहे.

अहिल्यानगरच्या जामखेड - बीड रस्त्यालगत हॉटेल कावेरी आहे. या हॉटेलचे मालक रोहित अनिल पवार (27) यांच्यावर काही गुंडांनी गोळीबार केला होता. त्यात एक गोळी त्यांच्या पायातून आरपार निघून गेली होती. त्यामुळे ते जबर जखमी झाले होते. त्यांच्यावर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्लेखोरांनी त्यांच्या चारचाकी वाहनाचीही तोडफोड केली आहे. परस्पर वादातून ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारावर 2 आरोपींना माग काढला आहे. आमदार रोहित पवार यांनी या घटनेसाठी नाव न घेता सभापती राम शिंदे यांना जबाबदार धरले आहे. ते म्हणाले, जामखेडमधील हॉटेल कावेरीचे मालक रोहित अनिल पवार यांच्यावर गोळीबार केल्याप्रकरणी ज्यांच्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला ते हे आहेत जामखेडमधील उल्हास विलास माने. याआधीही त्यांच्यावर डबल मर्डरचे गुन्हे दाखल आहेत. आता त्यांच्या पाठीशी कोण आहे, हे तुम्हीच या फोटोंमध्ये बघा. गल्लीतलं भांडण विधिमंडळात नेणारेही हेच आहेत, ज्यांना केवळ माझे विरोधक आहेत म्हणून भाजपाने विविध पदे दिली.

आता एवढी मोठी राजकीय ताकद पाठीशी असेल तर जामखेडमधील या गुंडांमध्ये भरदिवसा गोळ्या झाडून सामान्य माणसांचे मुडदे पाडण्याची हिंमत का येणार नाही? याचं उत्तर मुख्यमंत्री महोदयांनी द्यावं, असे ते म्हणालेत.

# वायू प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करा : पंकजा मुंडे



**मुंबईः** जालना व छत्रपती संभाजीनगरमधील प्रदूषण कमी करण्यासंदर्भात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला. जालनामधील हवा प्रदुषणासंदर्भात चिंता व्यक्त करून प्रदूषण कमी करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत. तसेच उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन प्रदूषण करणाऱ्या उद्योगांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याच्या सूचना पर्यावरण मंत्री मुंडे यांनी यावेळी दिल्या. जालना औद्योगिक वसाहत तसेच छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज, शेंद्रा, ऑरिक सिटी औद्योगिक वसाहतींमधील वायू व जल प्रदूषणासंदर्भात आज पर्यावरण मंत्री मुंडे यांनी मंत्रालयात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंग, सहसंचालक (हवा प्रदूषण) सतीश पडवळ यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील प्रादेशिक अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे व जिल्हा प्रशासनातील अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. जालना औद्योगिक वसाहतीमध्ये स्टील उद्योगामुळे हवेत धुलीकणांमुळे प्रदूषण होत आहे. यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या आहेत.

### महापालिका निवडणुकीत एकत्र पण जागावाटपावर मतभेद
# शिंदे गटाच्या मागणीला भाजपचा नकार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**

मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील दोन प्रमुख घटक असलेल्या शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यातील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत. गुरुवारी मुंबईत पार पडलेल्या जागावाटपाच्या बैठकीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने 2017 च्या निवडणुकीत शिवसेनेने जिंकलेल्या 84 जागांवर ठाम दावा केला. मात्र, भाजपने ही मागणी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावली. भाजपने 2017 मध्ये शिवसेनेच्या वाट्याला असलेल्या सर्व 84 जागा यंदाही शिंदे गटाला देण्यास नकार दिल्याने महायुतीतील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महापालिका निवडणुकीसाठी एकत्र लढण्याची घोषणा जरी करण्यात आली असली, तरी प्रत्यक्ष जागावाटपाच्या चर्चेत दोन्ही पक्षांमधील मतभेद तीव्र होत असल्याचे चित्र आहे.



या बैठकीआधीच शिंदे गटाला मुंबईत केवळ 52 जागा देण्याचा प्रस्ताव असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. मात्र, या संदर्भात झालेल्या पत्रकार परिषदेत दोन्ही पक्षांनी अशा कोणत्याही आकड्यावर चर्चा झाल्याचे नाकारले होते. तरीही, प्रत्यक्षात शिंदे गटाला हव्या असलेल्या जागांवर भाजपकडून अनास्था दाखवली जात असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. जागावाटपाच्या दुसऱ्या बैठकीनंतर शिवसेना-भाजप यांच्यात 150 जागांवर एकमत झाल्याचा दावा करण्यात आला असला, तरी कोणत्या जागा कोणाच्या वाट्याला येणार, यावर ठोस सहमती झालेली नाही.

भाजपने शिंदे गटाच्या 84 जागांच्या मागणीला नकार देताना एक नवी राजकीय मांडणी पुढे केली आहे. 2017 साली शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आलेल्या या जागांपैकी अनेक प्रभागांमध्ये आता ठाकरे गट मजबूत झाल्याचे भाजपचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत शिंदे गट आणि ठाकरे गट यांच्यात थेट लढत झाली, तर त्याचा फटका महायुतीला बसू शकतो, अशी भीती भाजपकडून व्यक्त केली जात आहे. शिंदे-ठाकरे थेट संघर्षात शिंदे गटाच्या उमेदवारांच्या पराभवाची शक्यता अधिक असल्याचे भाजपचे आकलन आहे.

### ईव्हीएमवरील वक्तव्यामुळे
# सुप्रिया सुळे चर्चेत

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**

मुंबईतून राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आणणारे विधान राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे. ईव्हीएमविरोधातील चर्चेवर लोकसभेत बोलताना त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे केवळ विरोधकच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या पक्षाची आणि मित्रपक्षांचीही अडचण वाढल्याचे चित्र आहे. ह्मी याच ईव्हीएम मशीनच्या माध्यमातून चार वेळा निवडणूक जिंकली आहे. त्यामुळे ईव्हीएम किंवा व्हीव्हीपॅटवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचे मला कारण दिसत नाही, असे सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळेंच्या या विधानामुळे त्यांच्या पक्षाच्या भूमिकेशी थेट विसंगती निर्माण झाली आहे. २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे माळशिरस मतदारसंघातील आमदार उत्तमराव जानकर यांनी ईव्हीएमविरोधात आंदोलन छेडले होते. त्यांनी मतपत्रिकेद्वारे पुन्हा मतदान घेण्याची मागणी करत थेट आपल्या गावात प्रतीकात्मक पेपर-बॅलेट मतदानही आयोजित केले होते. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते प्रत्यक्ष पाठिंबा देण्यासाठी गावात पोहोचले होते.

# धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १९ :**

पानशेत धरणात पोहण्यासाठी उतरलेल्या एका तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना वेल्हे पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव सद्दाम चांद व्हसुरे (वय ३०, रा. घुले कॉलनी, नांदेड सिटीजवळ, सिंहगड रस्ता) असे आहे.

याप्रकरणी वेल्हे पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सद्दाम व्हसुरे आणि त्याचे मित्र रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे गेले होते. तेथून मोटारीने परत येत असताना, ते पानशेत धरण परिसरात थांबले. पानशेत धरणाच्या काठावर बसून भेळ खाल्ल्यानंतर सद्दाम धरणात पोहण्यासाठी उतरला.

पोहत असताना त्याला अचानक दम लागला आणि तो पाण्यात बुडाला. त्याचे मित्र प्रकाश माळी, अनिल ओव्हाळ आणि राहुल गायकवाडे यांनी त्याला पाण्यातून बाहेर काढले. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले. सहायक पोलिस निरीक्षक किशोर शेवते आणि हवालदार मोघे यांनी घटनास्थळी भेट दिली असून, हवालदार एन. मोघे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# लाडक्या बहिणींना २ लाभ एकत्रित मिळण्याची शक्यता

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**




राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेने आतापर्यंतचा मोठा टप्पा पार केला आहे. योजनेसाठी नोंदणी केलेल्या एकूण २ कोटी ४० लाख महिलांपैकी तब्बल १ कोटी ६० लाख महिलांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे. मात्र, एकीकडे तांत्रिक प्रक्रिया वेगाने पूर्ण होत असतानाच दुसरीकडे निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे दोन महिन्यांचा लाभ न मिळाल्याने लाभार्थी महिलांच्या पदरी काहीशी निराशा आहे. विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणीमुळे युतीची सत्ता आली. १५ जानेवारीला महापालिका निवडणूक असल्याने त्यापूर्वीच लाडक्या बहिणींना नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन महिन्यांचा एकत्रित लाभ मिळण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

अपात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर पात्र महिलांची खातरजमा करण्यासाठी राज्य सरकारने १८ नोव्हेंबरपर्यंत ई-केवायसी बंधनकारक केली होती. दरम्यान, ई-केवायसी करताना अनेक लाभार्थींना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागल्याने तसेच गेल्या काही दिवसांत राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्ती आणि इतर अडचणींमुळे या योजनेतील अनेक पात्र लाभार्थींना ई-केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही. या अडचणींची गांभीर्याने नोंद घेत राज्य सरकारने ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र मुदत संपण्यासाठी अवघे १३ दिवस आहेत, मात्र अजूनही ८० लाख महिलांनी ई-केवायसी केलेली नसल्याचे दिसून येत आहे.

ज्या महिलांचे बँक खाते आधारशी लिंक आहे आणि ज्यांनी ई-केवायसी पूर्ण केले आहे त्यांनाच यापुढील लाभ मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. योजनेचा लाभ मिळावा यासाठी महिलांनी तातडीने आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. दरम्यान, सर्व निवडणुका झाल्या की ही योजना बंद होणार असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. मात्र, सत्ताधारी ही योजना सुरूच राहणार असल्याचे सांगत आहेत.

ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकर भरतात, अशा महिला या योजनेसाठी अपात्र आहेत. ज्यांच्या कुटुंबात कुणी सरकारी नोकरीत आहे किंवा पेन्शन घेते. ज्यांच्या कुटुंबाकडे चारचाकी वाहन आहे (ट्रॅक्टर वगळून).कुटुंबाकडे ५ एकरपेक्षा जास्त शेती असल्यास अपात्र आहेत.

सध्या या योजनेच्या रक्कमेत वाढ करून ती २,१०० रुपये करण्याबाबत चर्चा सुरू आहे, परंतु सध्या तरी १५०० रुपये दिले जात आहेत. तसेच, लाभ सुरू ठेवण्यासाठी आपले बँक खाते आधारशी लिंक असल्याचे आणि ी-पूर्ण करावी, असेही सांगण्यात येत आहे.

### अदृश्य इमारती, बोगस मतदार आणि कोरे ओळखपत्र
# काँग्रेसकडून 'व्होट चोरी' घोटाळ्याचा पर्दाफाश

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांमधील गंभीर अनियमितता समोर आली असून, काँग्रेसने सत्ताधारी भाजप आणि निवडणूक आयोगावर 'संघटित मतचोरी'चा खळबळजनक आरोप केला आहे. अस्तित्वात नसलेल्या इमारतींमध्ये शेकडो मतदारांची नोंदणी आणि चक्क कोरी 'एपिक' कार्ड्स (मतदार ओळखपत्र) वाटप करून निवडणुकीच्या निकालात फेरफार करण्याचा डाव असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.



माजी नगरसेविका शीतल म्हात्रे यांनी पत्रकार परिषदेत या पुराव्यांसह या घोटाळ्याचा पदार्फाश केला. यावेळी प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, माजी नगरसेवक बब्बू खान आणि निजामुद्दीन राईन उपस्थित होते. म्हात्रे यांनी सांगितले की, वॉर्ड क्रमांक १ मधील आयसी कॉलनी येथे 'भागडालाने' नावाची इमारत कागदोपत्री दाखवून तिथे १४३ मतदारांची नोंद करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवर अशी कोणतीही इमारत अस्तित्वात नाही.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, प्रशासनाकडून अशा मतदान पत्रांचे वाटप झाले आहे ज्यावर केवळ 'एपिक' क्रमांक आहे, मात्र मतदाराचे नाव आणि पत्ता गायब आहे. "हे कोरे ओळखपत्र म्हणजे 'ब्लँक चेक' सारखे असून, याद्वारे बोगस मतदानाची मोठी तयारी सुरू आहे," असा थेट आरोप म्हात्रे यांनी केला आहे. काँग्रेसने प्रारूप मतदार यादीच्या वेळीच अधिकृत हरकती नोंदवल्या होत्या. त्यावेळी निवडणूक अधिकाऱ्यांनी दुरुस्तीचे आश्वासन दिले, मात्र अंतिम यादीत या त्रुटी तशाच ठेवण्यात आल्या आहेत. आता नाव वगळता येणार नाही, असे सांगून अधिकारी हात झटकत असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

# बिबट्या इमारतीत शिरला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**

मुंबई लगतच्या मीरा-भाईंदरमध्ये आज सकाळीच एक बिबट्या इमारतीत शिरल्यामुळे एकच खळबळ माजली. या बिबट्याच्या हल्ल्यात एकाच कुटुंबातील 3 जण जखमी झाले आहेत. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी महत्प्रयासाने या बिबट्याला पिंजऱ्यात बंदिस्त केले.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मीरा भाईंदरमधील तलाव रोड परिसरातील पारिजात इमारतीत सकाळी 8 च्या सुमारास बिबट्या शिरला. त्याने दार उघडे असलेल्या एका घरात प्रवेश केला. तेव्हा एक 25 वर्षीय तरुणी व तिच्या कुटुंबातील इतर 3 सदस्य घरात होते. बिबट्याने या सर्वांवर हल्ला चढवला. त्यात तरुणीसह 3 जण जखमी झाले. त्यांचा आरडाओरडा ऐकूण इमारतीमधील इतर नागरीक सावध झाले. तसेच परिसरातील इतर नागरीकही गोळा झाले. त्यांनी जखमींना तत्काळ लगतच्या रुग्णालयात दाखल करत घटनेची माहिती पोलिसांना कळवली. त्यानंतर स्थानिक पोलिस व अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन बिबट्याला पकडण्याचे प्रयत्न सुरू केलेत. वन विभागाचे कर्मचारीही थोड्या वेळाने घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर त्यांनी बिबट्याला एका रुममध्ये बंद करून ठेवले. हा बिबट्या काही केल्या नियंत्रणात येत नव्हता. अखेर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी गनद्वारे इंजेक्शन देऊन त्याला बेशुद्ध केले. त्यानंतर जाळी टाकून त्याला कैद करण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे काही दिवसांपूर्वीच नागपुरातील एका वसाहतीत बिबट्या शिरला होता. त्यातही काहीजण जखमी झाले होते. तत्पूर्वी, पुण्याच्याही शहरी भागात हा प्राणी शिरला होता. पुण्याच्या केशवनगरातील कोणार्क रिवा व एल्कोन सिल्व्हर लीफ सोसायटीच्या पार्किंगमध्येही बिबट्या फिरत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले.

# नऊ वर्षांनंतरचा ‘रणसंग्राम’ निर्णायक वळणावर

## जिल्ह्यातील उर्वरित न.प. व न.पं. निवडणुकांचे आज मतदान, उद्या निकाल





### मतदानाची आकडेवारी

| प्रभाग | प्रभाग | केंद्र | पुरुष | स्त्री | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| अंजनगाव (सुर्जी) | 14 | 52 | 23,923 | 22,697 | – | 46,620 |
| अचलपूर (19 ब, 10 अ) | 2 | 11 | 4,827 | 4,700 | – | 9,527 |
| दर्यापूर (2 अ) | 1 | 31 | 588 | 1,611 | – | 3,199 |
| वरूड (12 अ) | 1 | 4 | 1,920 | 1,860 | – | 3,780 |
| धारणी (14, 16) | 2 | 2 | 745 | 873 | 1 | 1,619 |
| एकूण | 20 | 72 | 33,003 | 31,741 | 1 | 64,745 |

### ठळक बाबी

- नऊ नगरपरिषदा व दोन नगरपंचायतींचा अंतिम फैसला
- नगराध्यक्ष पदासाठी 64 उमेदवार रिंगणात
- सदस्य पदांसाठी 1,048 उमेदवारांची निवडणूक
- महायुती व महाविकास आघाडी अधिकृत नसल्याने तिहेरी लढती
- अपक्ष व बंडखोरांनी रंगत वाढवली

### या प्रभागांत मतदान

- अचलपूर : प्रभाग 19 ब (8 सदस्य), प्रभाग 10 अ (9 सदस्य)
- वरूड : प्रभाग 12 अ (2 सदस्य)
- दर्यापूर : प्रभाग 2 अ (6 सदस्य)
- धारणी (नगरपंचायत) : प्रभाग 14 (4 सदस्य), प्रभाग 16 (2 सदस्य)

### पोलिंग पार्टी रवाना, मतमोजणीची तयारी पूर्ण

जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, अचलपूर, दर्यापूर, वरूड व धारणी येथील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांसाठी दि. 19 डिसेंबर रोजी पोलिंग पार्टी रवाना करण्यात आल्या. मतदान केंद्रांवर पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला असून, दि. 21 डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीसाठी स्ट्रॉंगरूम पूर्णत: सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,(दि.19)**– जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी उद्या शनिवार, दि. 20 डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडत असून, रविवार, दि. 21 डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहेत. तब्बल नऊ वर्षांनंतर होत असलेल्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

उद्या अंजनगाव सुर्जी व अचलपूर नगरपरिषदेतील प्रत्येकी दोन प्रभागांत, दर्यापूर व वरूड नगरपरिषदेत प्रत्येकी एका प्रभागात, तर धारणी नगरपंचायतीतील दोन प्रभागांत मतदान होत आहे. या मतदानानंतर जिल्ह्यातील एकूण दहा नगरपरिषदा व दोन नगरपंचायतींचे निकाल अंतिम होणार आहेत. अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीकडे विशेष लक्ष लागले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गुरुवारी झालेला भव्य रोड शो तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दोन दिवसांचा मुक्काम यामुळे या निवडणुकीचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे. मंगळवारी, दि. 2 डिसेंबर रोजी पार पडलेल्या मतदानात जिल्ह्यात सरासरी 70 टक्क्यांपर्यंत उच्चांकी मतदान नोंदविण्यात आले होते. कोणत्याही ठिकाणी अनुचित प्रकार न घडता निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. मात्र अनेक प्रभागांमध्ये एका-एका मतासाठी चुरशीची लढत पाहायला मिळाली. त्यामुळे वाढलेला मतदानाचा टक्का नेमका कुणाच्या पारड्यात जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून त्याचे उत्तर 21 डिसेंबर रोजी मतमोजणीनंतर मिळणार आहे.

# खुनाचा बदला खून : भरदिवसा युवकाची निर्घृण हत्या

## वाळकी रोडवरील बोरनदी धरण प्रवेशद्वाराजवळ थरार; चार हल्लेखोर पसार



### बदल्याच्या भावनेतून हत्या ?

प्राथमिक तपासात यश रोडगे हत्येचा बदला घेण्यासाठीच मंथनची हत्या झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. पोलिस सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व प्रत्यक्षदर्शींच्या आधारे तपास करत आहेत.

### आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके

हल्लेखोरांचा माग काढण्यासाठी विशेष पथके त्यांच्या संभाव्य दिशेने रवाना करण्यात आली असून तपास वेगात सुरू आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी दिली.

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 19)** – नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वाळकी रोडवरील बोरनदी प्रकल्पाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर शुक्रवारी (दि. 19) दुपारी सुमारे 3.30 वाजताच्या सुमारास भरदिवसा एका युवकाची धारदार शस्त्रांनी निर्घृण हत्या करण्यात आली. या थरारक घटनेमुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे.


हत्या झालेल्या युवकाचे नाव मन्या उर्फ मंथन रवींद्र पाळनकर (रा. शिलांगण रोड, सातुर्णा, अमरावती) असे आहे. काही महिन्यांपूर्वी अमरावती शहरात घडलेल्या यश रोडगे हत्याकांडातील तो आरोपी असल्याची माहिती पुढे आली आहे. आठ दिवसांपूर्वी गुन्हे शाखेने मंथनला एका प्रकरणात अटक केली होती; मात्र तो जामिनावर मुक्त झाला होता.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी सकाळी एका संशयिताने मंथनला मोबाईलवर संदेश पाठवून वाळकी रोडवर बोलावले. त्यानुसार मंथन विना नंबरप्लेटच्या स्पोर्ट्स दुचाकीवर बोरनदी प्रकल्पाच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचताच, आधीच दबा धरून बसलेल्या चार जणांनी त्याला घेरले. क्षणातच मानेवर, हातावर व पोटावर धारदार शस्त्रांनी सपासप वार करण्यात आले.

गंभीर जखमी अवस्थेत मंथन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथकाने पाहणी करून पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला असून, घटनास्थळावरून विनानंबरची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

# भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

## पतीचा जागीच मृत्यू, पत्नी गंभीर जखमी





महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी/हिवरखेड (दि.19)** – मोर्शी-वरुड मार्गावर हिवरखेड फाट्याजवळ भरधाव ट्रकने दुचाकीला जबर धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकी चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी (दि. 19) सायंकाळी सुमारे 5 वाजताच्या सुमारास घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बद्रीनाथ रूपसा मसराम (वय 35, रा. जापका, ता. प्रभात पट्टन) व त्यांची पत्नी ज्योती बद्रीनाथ मसराम (वय 30) हे दाम्पत्य शेंदुरजना बाजार येथून काम आटोपून दुचाकी (क्र. एमएच 40 जी 55 57) ने आपल्या गावी जापका येथे जात होते.

मोर्शी-हिवरखेड मार्गावर असलेल्या हिवरखेड फाट्याजवळ समोरून वरुडकडून मोर्शीकडे भरधाव वेगाने येणाऱ्या एल.पी. ट्रकने (क्र. एमएच 40 सीडी 34 34) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात दुचाकी चालक बद्रीनाथ मसराम यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी ज्योती मसराम गंभीर जखमी झाल्या. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन जखमी महिलेला प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. दरम्यान, मृत बद्रीनाथ मसराम यांचे शव मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नांदगावकर, हवालदार मंगेश श्रीराव व वेदेश्वर पिसे यांनी घटनास्थळी धाव घेऊन ट्रकसह चालकाला ताब्यात घेऊन अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, अमरावती येथे वडिलांनी आपली किडनी देऊन वाचविले मुलीचे प्राण





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 19)**– स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल अमरावती. येथे 64 वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर रुग्ण ही किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही वर्षांपासून डायलिसिस करत होती. तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व तिच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय ,अमरावती येथे होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली. तेव्हा आज रुग्णालयात झालेले 64 वे किडनी प्रत्यारोपण, हे 36 वर्षीय सोनल राजू चौधरी यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण ही अमरावती येथील रहिवासी असुन मागील काही वर्षापासून डायलिसिस चालु होते मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलीच्या पुढील भविष्याचा विचार करून वडील सुरेश रंगराव गुहे (65वर्ष )यांनी आपली एक किडनी मुलगी सोनल ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी सोनल ला देऊन तिला नवीन जीवन दिले.महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने ,युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. राहुल घुले, डॉ. प्रतिक चिरडे, डॉ विशाल बाहेकर,बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. रमणिका ढोमणे ,डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, आशिष तायडे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, नीता कांडलकर, दिपाली तायवाडे, माधुरी सोनटक्के, , विवेक तायडे, वैष्णवी निकम, कीर्ती तायडे, अक्षय पवार, मयुरी खेरडे,अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, शुभांगी टिंगणे, आर गवई ,विशाखा बरवान, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे, अनिता गोमकाळे ,आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे,औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, पंकज बेलुरकर,आशिष थुल, गजानन मातकर, अविनाश राठोड, आशिष मिश्रा, शिवा भोंगाळे,रुपेश हरडे,दिपटे, भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

## कालव्यात वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

**तिवसा** – तिवसा तालुक्यातील आनंदवाडी परिसरात काल कॅनॉलमध्ये वाहून गेलेल्या 21 वर्षीय युवकाचा मृतदेह शुक्रवारी सकाळी आढळून आला. आनंदवाडीपासून सुमारे दोनशे मिटर अंतरावर कॅनॉलमध्ये मृतदेह सापडल्याने शोधमोहीमेला अखेर पूर्णविराम मिळाला. मृत युवकाचे नाव ओम अरविंद सहारे (वय 21, रा. अमरावती) असे आहे. ओम आपल्या वडिलांसोबत आनंदवाडी परिसरातील कॅनॉलजवळ गेला होता. पाय धुण्यासाठी ते कॅनॉल काठावर थांबले असताना अचानक त्याचा तोल गेले आणि ते कॅनॉलमध्ये पडले. कॅनॉलमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने प्रवाह अत्यंत वेगवान होता. काही क्षणांतच ओम पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. ही घटना वडिलांच्या डोळ्यादेखत घडल्याने वातावरण हृदयद्रावक झाले होते. या घटनेची माहिती मिळताच तिवसा तहसीलदार, तिवसा पोलीस ठाणे, आपत्ती व्यवस्थापन विभाग, पाटबंधारे विभाग तसेच डीडीआरएफ पथक घटनास्थळी दाखल झाले. सायंकाळपासून शोधमोहीम सुरू होती. सकाळी कॅनॉलमधील पाणी कमी झाल्यानंतर आनंदवाडीपासून सुमारे दोनशे मिटर अंतरावर ओमचा मृतदेह आढळून आला.

# प्रतिबंधित विदेशी दारू वाहतुकीवर उत्पादन शुल्कची धाड

## भरारी पथकाची कारवाई; 1.36 लाखांचा मुद्देमाल जप्त



महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,(दि.19)**– महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या विदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभागाच्या भरारी पथकाने धडक कारवाई करत दोन आरोपींना रंगेहात पकडले. या कारवाईत एकूण 1 लाख 36 हजार 680 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

निवडणूकांची आदर्श आचारसंहिता, नववर्ष व नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर विभागीय भरारी पथक सक्रिय करण्यात आले आहे. दिनांक 17 डिसेंबर 2025 रोजी सालबर्डी-पाळा मार्गावरील सातपुडा शाळेजवळील पुलाजवळ, मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीत मध्यप्रदेश निर्मित व तेथेच विक्रीसाठी असलेली, महाराष्ट्रात प्रतिबंधित विदेशी दारू दुचाकीवरून वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून राम भगवानदास अहेरवार (28) व गौतम धाडसे (20) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई प्रभारी निरीक्षक एम. पी. चीटमाटवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस. ए. वानखडे करीत आहेत.

### जप्त मुद्देमाल

| | |
|---|---|
| 180 मि.ली. रॉयल स्टँग व्हिस्की | : 95 बाटल्या |
| 180 मि.ली. मॅकडॉल्स नं. 1 | : 48 बाटल्या |
| 180 मि.ली. ऑफिसर चॉईस | : 48 बाटल्या |
| 90 मि.ली. आयकॉनीक व्हिस्की | : 96 बाटल्या |
| दुचाकी वाहन | : 80,000 |
| एकूण किंमत | : 1,36,680 |

## वाहन तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता

**आरटीओ अमरावतीत व्हिडिओ रेकॉर्डिंगचा निर्णय**

**अमरावती** – प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथे वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक व अचूक करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. केंद्रीय मोटार वाहन नियमांनुसार होणाऱ्या संपूर्ण वाहन तपासणी प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार असून, त्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयाची मान्यता मिळाली आहे. ही व्हिडिओ रेकॉर्डिंग प्रक्रिया भाडे तत्त्वावर राबवली जाणार असून, यासाठी अनुभवी व्हिडिओ रेकॉर्डिस्ट व सेवा पुरवठादारांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात आली आहेत. वाहन तपासणीदरम्यान प्रत्येक टप्प्याची नोंद व्हिडिओ स्वरूपात घेतली जाणार असल्याने प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास तसेच कोणत्याही प्रकारच्या तक्रारींना आळा बसण्यास मदत होणार आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, इच्छुक व अनुभवी व्यक्ती अथवा संस्थांनी आपली दरपत्रके ‘प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, कॅम्प, अमरावती – 444602’ या पत्त्यावर सादर करावीत.

**CHANGE OF NAME**
**Old Name :** Sita ben
**New Name :** Sitaben
**Address**
: C/O Karada Sanjay kumar. kodiyavada. kodiyavada. vjayna-gar Kodiyavada. Kodiawada. Sabarkantha Gujarat. 383462

# नवीन वर्षात 46 लग्नमुहूर्त; 22 सार्वजनिक सुट्ट्या

## सण-उत्सवांची रेलचेल, काही महत्त्वाचे दिवस रविवारी




महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट,(दि.19)**– नव्या आशा, संकल्प आणि अपेक्षा घेऊन येणाऱ्या सन 2026 या नववर्षाची चाहूल लागली आहे. बाजारपेठेत नव्या वर्षाच्या दिनदर्शिकांनी दुकाने सजली असून, नागरिकांकडून कॅलेंडर खरेदीला वेग आला आहे. 2026 च्या दिनदर्शिकेवर नजर टाकल्यास वर्षभरात 22 सार्वजनिक सुट्ट्या असून, त्याशिवाय दुसरा व चौथा शनिवार तसेच रविवारच्या साप्ताहिक सुट्ट्यांचा लाभ मिळणार आहे.

नवीन दिनदर्शिकांमध्ये दिनविशेष, राशिभविष्य, लग्न, मुंज, साखरपुडा, भूमिपूजन, वास्तू मुहूर्त तसेच धार्मिक व सामाजिक सण-उत्सवांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. शुभकार्यांसाठी 46 लग्नमुहूर्त उपलब्ध असल्याने विवाहसोहळ्यांची धामधूम वर्षभर पाहायला मिळणार आहे. यावर्षी 3 मार्च रोजी खग्रास चंद्रग्रहण संपूर्ण भारतातून दिसणार आहे. मात्र महाशिवरात्र, रंगपंचमी, अक्षयतृतीया, घटस्थापना, दीपावली लक्ष्मीपूजन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन हे काही महत्त्वाचे दिवस रविवारी आल्याने अतिरिक्त सुट्ट्यांचा लाभ कमी मिळण्याची शक्यता आहे.

### महत्त्वाचे दिनविशेष

| | |
|---|---|
| 3 जानेवारी | – सावित्रीबाई फुले जयंती |
| 19 फेब्रुवारी | – शिवजयंती |
| 14 एप्रिल | –डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| 1 मे | – महाराष्ट्र दिन |

### सण-उत्सवांची मालिका

मकरसंक्रांत, होळी-धुलिवंदन, गुढीपाडवा, रामनवमी, बुद्ध पौर्णिमा, बकरी ईद, नागपंचमी, गणेशोत्सव, दसरा, दीपावली, गुरुनानक जयंती ते 25 डिसेंबरच्या ख्रिसमस पर्यंत सण-उत्सवांची मोठी रेलचेल 2026 मध्ये अनुभवता येणार आहे.

# कृतघ्नांच्या भाऊगर्दीत हरविणार का प्रज्ञा सातव?

अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, विजयाराजे शिंदे यांनी ६ एप्रिल १९८० रोजी मुंबईत महाअधिवेशन भरवून भारतीय जनता पक्ष स्थापन केला.

१९७७ साली लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेने स्थापन केलेल्या जनता पक्षातून फुटून निघत आणि लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या जनता पक्षाची 'पुण्याई' पदरात पाडून घेण्यासाठी 'भारतीय' हा शब्द पुढे लावीत भारतीय जनता पक्ष स्थापन करण्यात आला.

अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी हे दिग्गज नेते होतेच परंतु आज हा पक्ष नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी ताब्यात घेतला असून २०१४ पासून या पक्षाची भूक इतकी वाढलीय की जणू काही 'भस्म्या' झालाय की काय असा प्रश्न पडावा. सगळ्या प्रादेशिक पक्षांबरोबरच इतर पक्षांतील नेते कार्यकर्ते यांना गिळंकृत करण्याचेच काम हा 'बकासूर' जनता पक्ष करीत सुटलाय.

बरं, आरोपांच्या फैरी झाडायच्या आणि त्यांनाच आपल्या धुलाई यंत्रातून स्वच्छ करीत भाजप (भारत) स्वच्छता अभियानचा टेंभा मिरवायचा.

लेखाचे शीर्षक 'कृतघ्नांच्या भाऊगर्दीत' असे दिले आहे, खरे तर 'एहसान फरामोश' हा शब्द वापरणार होतो, पण त्यातल्या त्यात जरा सुसंस्कृत शब्द म्हणून 'कृतघ्न' हा शब्द जाणीवपूर्वक वापरलाय. तर अशा कृतघ्नांच्या भाऊगर्दीत हरविणार कां प्रज्ञा सातव? हा प्रश्न मनाला पडला आहे.

त्याचं कारणच तसे आहे. रजनी सातव या कॉंग्रेस पक्षाच्या माजी मंत्री. कळमनुरी मतदारसंघाचे त्या प्रतिनिधित्व करीत होत्या. त्यांचे चिरंजीव राजीव सातव यांच्यासाठी दस्तुरखुद्द राहुल गांधी यांनी ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्याकडे हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी शब्द टाकला आणि राहुल गांधी यांच्या शब्दाला मान देत शरद पवार यांनी मनाचा मोठेपणा दाखवीत आपला विद्यमान मतदारसंघ राजीव सातव यांच्यासाठी कॉंग्रेस पक्षाला देऊन टाकला.

राजीव सातव यांनी राहुल गांधी यांच्या विश्वासाला पात्र राहात पक्षात चांगले स्थान निर्माण केले. दुर्दैवाने राजीव सातव यांचे देहावसान झाले आणि राजीव पत्नी प्रज्ञा सातव यांना उमेदवारी दिली. त्या दोन वेळा विधानपरिषदेवर निवडून आल्या. परंतु पक्षातील अंतर्गत गटबाजी, अन्याय अशी निरर्थक कारणे देत त्यांनी चक्क कमळ हातात घेऊन थेट राहुल गांधी यांच्या पाठीत खंजीर खुपसला.

खरे म्हणजे २०१४ पासूनची भारतीय जनता पक्षाची भस्म्यासम वाटचाल पाहता कमळाऐवजी निवडणूक आयोगाने या पक्षाला खंजीर हेच निवडणूक चिन्ह देणे औचित्यपूर्ण ठरले असते. पण राष्ट्रीय काय किंवा राज्यातील निवडणूक यंत्रणा ही भारतीय जनता पक्षाचे एक अंग होऊन बसली असल्याचा आरोप विरोधी पक्ष करीत आहेत ते काही खोटे नाही.

मराठवाडा मधील नांदेड, हिंगोली सह सगळा भाग या बकासुराच्या नरड्यात गेला आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. मुळात शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण हे कधीही निष्ठावंत नव्हते. संजय गांधी यांचे जोडे उचलणारे असा आरोप आणिबाणीच्या काळात ज्यांच्यावर झाला होता ते तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण कॉंग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस स्थापन करते झाले आणि वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर खुपसणारे असा आरोप ज्यांच्यावर झाला.





ते पुरोगामी लोकशाही दलाचे मुख्यमंत्री शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून सामील झाले. त्या निष्ठावंत नसलेल्या शंकररावांचे पुत्र अशोक चव्हाण हे आपल्या मित्रांना व परिवाराला घेऊन भारतीय जनता पक्षाचे राजकीय पर्यटन करायला निघाले, याचे कुणाला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.



योगेश वसंत त्रिवेदी
मुंबई.
९८९२९३५३२१.
(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)

परंतु ज्या राजीव सातव यांच्या पक्षनिष्ठेवर राहुल गांधी यांनी डोळे झाकून विश्वास ठेवला त्यांच्या धर्मपत्नी प्रज्ञा या राजीव सातव यांच्या निवार्णानंतर राहुल गांधी यांच्या पाठीत खंजीर खुपसतील आणि तमाम कृतघ्नांच्या भाऊगर्दीत हरवतील यावर विश्वास ठेवणे कठीण बनले होते. परंतु ही किमया देवाभाऊंनी 'करुन दाखविली'.

मला या ठिकाणी राज्य निवडणूक आयोगाचे माजी आयुक्त आणि कर्तव्यकठोर प्रशासक नंदलाल यांचे एक महत्त्वपूर्ण विधान आठवते. ते म्हणायचे की, मतदारसंघ हा मतदारसंघ आहे तो काही आमदार संघ किंवा खासदार संघ नाही. हे मतदारसंघ कुणाच्या सातबा?यावर करुन दिलेले नाहीत. त्यामुळे जे जे निवडून आलेले नेते आहेत त्यांनी आपण जनतेचे सेवक आहोत, मतदारसंघाचे मालक नाहीत, ही खुणगांठ मनाशी पक्की बांधून ठेवणे आवश्यक आहे. अर्थात आजमितीला हे सांगणे म्हणजे दगडावर डोके आपटण्यासारखे आहे.

'मला या भागाचा विकास करायचा आहे, म्हणून मी पक्षांतर केले', अशी लोणकढी थाप प्रत्येक जण पक्ष बदलतांना मारीत असतो आणि तशी लोणकढी थाप प्रज्ञा सातव यांनीही मारली आणि 'सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास' हा 'नरेंद्रनारा' आवर्जून दिला. या प्रकरणामुळे पक्षश्रेष्ठींनी यापुढे विचार नक्की करावा आणि आपण कुणासाठी, कुणाकडे शब्द टाकतो, त्याचे पुढे काय होणार याची दक्षता घ्यावी.

तूर्तास दिल्या घरी, नव्हे, गेलेल्या घरी सुखी रहा, एवढेच प्रज्ञा राजीव सातव यांच्या संदर्भात म्हणणे आपल्या हाती आहे. तमाम राजकीय पर्यटकांना ऐन निवडणुकीच्या मौसमात मनःपूर्वक शुभेच्छा ! प्रज्ञा सातव यांच्या भाजप प्रवेशामुळे कोण कोण काय काय आडाखे बांधताहेत ते पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

------------

(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत.)

# डिग्रीपलीकडे : तरुणांनी उद्योगाकडे वळावे..

आजच्या काळात सुशिक्षित तरुण म्हणजे पदवीधर, पदव्युत्तर, व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेली पिढी अशी ओळख तयार झाली आहे. शिक्षणामुळे विचारांची व्याप्ती वाढली, तंत्रज्ञानाची ओळख झाली आणि जागतिक संधींचे दरवाजे खुले झाले.

मात्र या सगळ्या पार्श्वभूमीवर एक वास्तव प्रकर्षाने जाणवते–अनेक तरुणांची स्वप्ने आजही केवळ नोकरीपुरती मर्यादित आहेत. सरकारी नोकरी, खासगी क्षेत्रातील स्थिर पगार, महिनाअखेरीची खात्री–यापलीकडे विचार करण्याची मानसिकता फारशी विकसित झालेली दिसत नाही. ही स्थिती बदलण्याची वेळ आता आली आहे.

डिग्री मिळवणे हा शेवटचा टप्पा नसून, तो केवळ सुरुवात आहे; पुढची दिशा ही उद्योग, व्यवसाय आणि उद्योजकतेकडे असायला हवी.

भारतासारख्या देशात तरुण लोकसंख्या ही सर्वात मोठी ताकद मानली जाते. या तरुणांकडे शिक्षण आहे, ऊर्जा आहे, कल्पकता आहे आणि तंत्रज्ञान हाताशी आहे. मात्र या क्षमतेचा पुरेपूर उपयोग होताना दिसत नाही.

दरवर्षी लाखो विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या शोधात बाहेर पडतात, पण उपलब्ध नोकऱ्यांची संख्या मर्यादित आहे. परिणामी स्पर्धा वाढते, निराशा वाढते आणि काही वेळा शिक्षणावर केलेली गुंतवणूक निष्फळ ठरल्याची भावना निर्माण होते. यावर एकमेव शाश्वत उपाय म्हणजे तरुणांनी स्वतःसाठी आणि इतरांसाठी रोजगार निर्माण करणाऱ्या भूमिकेत प्रवेश करणे.

छोटा उद्योग किंवा व्यवसाय हा अनेकदा कमी प्रतिष्ठेचा, जोखमीचा किंवा अनिश्चित उत्पन्नाचा मार्ग म्हणून पाहिला जातो. ही मानसिकता सुशिक्षित वर्गात विशेषतः आढळते. मात्र प्रत्यक्षात छोट्या उद्योगांवरच देशाची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर उभी आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र हे देशातील सर्वाधिक रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे. अन्नप्रक्रिया, कृषीपूरक उद्योग, दुग्धव्यवसाय, हस्तकला, पर्यटन, सेवा उद्योग, डिजिटल सेवा, स्थानिक उत्पादनांचे मार्केटिंग अशा असंख्य क्षेत्रांमध्ये छोट्या भांडवलातून सुरू होणाऱ्या व्यवसायांना मोठी संधी आहे. सुशिक्षित तरुणांनी या क्षेत्रात प्रवेश केला तर गुणवत्ता, नियोजन आणि व्यावसायिकता आपोआप वाढेल.

आजचे शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित राहिलेले नाही. व्यवस्थापन, लेखांकन, माहिती तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, लॉजिस्टिक्स, ग्राहक व्यवस्थापन अशा अनेक बाबींचे प्राथमिक ज्ञान तरुणांना मिळत आहे. या ज्ञानाचा वापर नोकरीतच व्हावा, अशी अट नाही. उलट स्वतःचा उद्योग उभारताना हे ज्ञान अधिक प्रभावीपणे वापरता येते.

उदाहरणार्थ, एक कृषी पदवीधर आधुनिक पद्धतीने शेतीपूरक व्यवसाय सुरू करू शकतो; वाणिज्य शाखेचा विद्यार्थी छोट्या उद्योगांचे आर्थिक व्यवस्थापन सक्षमपणे करू शकतो; तर संगणकशिक्षित तरुण डिजिटल सेवा, ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा स्थानिक व्यवसायांसाठी तंत्रज्ञानाधारित उपाय विकसित करू शकतो.

सरकारही उद्योजकतेला चालना देण्यासाठी विविध योजना राबवत आहे. स्टार्ट-अप इंडिया, मुद्रा योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, कौशल्य विकास योजना यांसारख्या उपक्रमांमुळे भांडवल, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाची उपलब्धता वाढली आहे.

बँकिंग प्रणाली तुलनेने सुलभ झाली असून डिजिटल व्यवहारांमुळे पारदर्शकता वाढली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अगदी छोटा उद्योगही स्वतःची बाजारपेठ निर्माण करू शकतो. पूर्वी ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या, त्या आज सुशिक्षित तरुणांसाठी शक्य झाल्या आहेत.



डॉ. भारत कऱ्हाड
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

उद्योगाकडे वळताना जोखीम असते, हे नाकारता येणार नाही. मात्र नोकरीतील असुरक्षितता, बदलते बाजार, कराराधारित रोजगार यामुळे आज नोकरीही पूर्णतः सुरक्षित राहिलेली नाही.

उद्योगात अपयश आले तरी त्यातून मिळणारा अनुभव, आत्मविश्वास आणि कौशल्ये पुढील वाटचालीसाठी उपयोगी ठरतात. उद्योजकतेचा मार्ग हा केवळ आर्थिक लाभाचा नसून, तो व्यक्तिमत्त्व विकासाचा मार्ग आहे. निर्णयक्षमता, नेतृत्व, संवादकौशल्य, संकटांशी सामना करण्याची ताकद या सगळ्या गुणांचा विकास उद्योगातूनच घडतो.

छोट्या उद्योगांचे आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे स्थानिक विकास. तरुणांनी गावात, तालुक्यात किंवा जिल्ह्यात उद्योग सुरू केले तर स्थलांतर कमी होते. स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाल्यामुळे सामाजिक स्थैर्य निर्माण होते. गावांची अर्थव्यवस्था मजबूत होते आणि शहरांवरचा ताण कमी होतो. सुशिक्षित तरुणांनी उद्योगात उतरल्यास स्थानिक संसाधनांचा शास्त्रीय वापर होतो आणि पर्यावरणपूरक विकासालाही चालना मिळते.

आज गरज आहे ती मानसिकतेतील बदलाची. डिग्री मिळाली म्हणजे नोकरीच हवी हा विचार मागे टाकून डिग्रीच्या आधारे आपण काय निर्माण करू शकतो, हा विचार पुढे आणावा लागेल. शिक्षण हे सुरक्षित नोकरीचे तिकीट नसून, ते स्वतंत्र उभे राहण्याचे साधन आहे, ही जाणीव तरुणांमध्ये रुजली पाहिजे. कुटुंब, समाज आणि शिक्षणसंस्था यांनीही उद्योगाकडे वळणाऱ्या तरुणांना पाठबळ देणे तितकेच आवश्यक आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, देशाचा भविष्यातील विकास हा मोठ्या उद्योगांइतकाच छोट्या उद्योगांवर अवलंबून आहे. या उद्योगांना दिशा देण्याची, आधुनिकतेची जोड देण्याची आणि टिकावू बनवण्याची क्षमता सुशिक्षित तरुणांकडे आहे. डिग्री ही केवळ ओळख न राहता ती संधी निर्माण करण्याचे साधन ठरावी. तरुणांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन उद्योगाकडे वळले, तर केवळ त्यांचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे आणि राष्ट्राचे भविष्य अधिक मजबूत आणि स्वावलंबी होईल.

■ ■ ■

# : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विषारी फुत्कार : लोकशाहीच्या अंगणात पसरलेली असहिष्णुतेची झाडे

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती संवाद, संयम, सहिष्णुता आणि लोकाभिमुखतेच्या मूल्यांवर उभी असलेली व्यवस्था आहे. मात्र, सत्तेच्या शिखरावर बसलेले काही लोक जेव्हा शब्दांचा संयम गमावतात, तेव्हा ते शब्द केवळ वक्तव्य राहत नाहीत, तर समाजमनाला विषारी फुत्कार देणारे नाग बनतात. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अलीकडील काही विधानं ही त्याच प्रकारची विषारी फुत्कार असल्याची भावना सर्वसामान्य जनतेत रुजताना दिसते.

सत्तेतील अहंकार आणि शब्दांची धार अजित पवार हे राज्यातील अनुभवी, ताकदवान आणि प्रभावी नेते आहेत, यात शंका नाही. परंतु अनुभव जितका मोठा, तितकी जबाबदारीही मोठी असते. दुर्दैवाने, अनेक वेळा त्यांच्या भाषणांतून उमटणारी आक्रमकता, चिडचिड, उपरोध आणि धमकीचा सूर हा लोकशाही संस्कृतीला शोभणारा नाही.

मी काय करतो ते बघाच, जास्त बोलाल तर..अशा शब्दांतून संवाद नव्हे, तर दडपशाहीचा इशारा दिला जातो. जनतेशी संवाद की जनतेवर दडपण? लोकप्रतिनिधींचे शब्द हे समाजासाठी दिशादर्शक असतात. मात्र जेव्हा उपमुख्यमंत्री सार्वजनिक मंचावरून संतप्त, अवमानकारक आणि असहिष्णू भाषेत बोलतात, तेव्हा ते केवळ विरोधकांनाच नव्हे तर सामान्य नागरिकांनाही भयभीत करतात.

शेतकरी, कर्मचारी, आंदोलनकर्ते किंवा पत्रकार यांच्याबाबत वापरलेली भाषा ही लोकशाहीतील संवादाच्या परंपरेवर घाला घालणारी ठरते.

विषारी फुत्कारांचे दुष्परिणाम राजकीय नेत्यांचे शब्द समाजमनावर खोल परिणाम करतात. आक्रमक वक्तव्यांमुळे समाजात द्वेष आणि तणाव वाढतो, लोकशाही मूल्यांवरचा विश्वास डळमळीत होतो, तरुण पिढीसमोर चुकीचा आदर्श उभा राहतो, प्रशासनावर



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

दबाव आणि भीतीचे वातावरण निर्माण होते.

आज जे शब्द सत्ताधाऱ्यांकडून येतात, ते उद्या रस्त्यावर उतरून हिंसेचे रूप धारण करू शकतात, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

टीका म्हणजे शत्रुत्व नव्हे, लोकशाहीत टीका ही शासनाची शत्रू नसून तिची ताकद असते. परंतु टीकेला विरोध करण्याऐवजी धमकी, उपहास किंवा अवहेलना केली गेली, तर ते सत्तेच्या असुरक्षिततेचे लक्षण ठरते.

अजित पवार यांच्याकडून अपेक्षा आहे की त्यांनी टीकेकडे शत्रुत्व म्हणून न पाहता आत्मपरीक्षणाची संधी म्हणून पाहावे. खरे नेतृत्व तेच, जे कठोर प्रश्नांनाही संयमाने सामोरे जाते.

शब्दांनी जखमा करणं सोपं असतं, पण शब्दांनी दिलासा देणं हेच खऱ्या लोकनेत्याचं लक्षण आहे. आज राज्य आर्थिक, सामाजिक आणि नैतिक आव्हानांच्या उंबरठ्यावर उभं आहे.

अशा काळात उपमुख्यमंत्र्यांकडून विषारी फुत्कार नव्हे, तर संवादाचे शीतल वारे अपेक्षित आहेत, हीच नेतृत्वाची खरी परीक्षा आहे.

शेवटचा सवाल, सत्ता ही तात्पुरती असते, पण शब्दांची जखम कायमची राहते. अजित पवार यांचे शब्द इतिहासात धमकीचे फुत्कार म्हणून नोंदले जातील की लोकशाहीचे मार्गदर्शक म्हणून हा निर्णय त्यांच्या आजच्या भाषेवर अवलंबून आहे. पण लोकशाही वाचवायची असेल, तर सत्ताधाऱ्यांनी आधी आपल्या शब्दांवर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे.

■ ■ ■

# भारतीय रोजगार करार!

भारतीय कामगारांसाठी एक आनंदाची बातमी आहे. रशिया कुशल आणि अर्ध-कुशल अशा १० लाख भारतीय कामगारांना रोजगार देईल. भारत रशियन कामगारांना रोजगाराच्या संधी देखील प्रदान करेल, परंतु ही रशियासाठी एक गंभीर समस्या आहे.

दोन्ही देशांदरम्यान कामगार गतिशीलता करार झाला आहे, ज्या अंतर्गत रशिया भारतीयांना नोकऱ्या देईल. परराष्ट्र आणि कामगार मंत्रालयांनी या कराराची पुष्टी केली आहे. मंत्रिमंडळ आणि मंत्रिस्तरीय पातळीवर शिखर परिषदेच्या चर्चा आधीच झाल्या आहेत.

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यातील संवादानंतर, कराराला हिरवा कंदील देण्यात आला. आता, तो शक्य तितक्या लवकर अंमलात येईल. रशिया भारतीय गवंडी, वेल्डर, आयटी अभियंते आणि परिचारिका तसेच बांधकाम, तेल आणि वायू, कृषी, वस्त्रोद्योग, बँकिंग आणि आरोग्य क्षेत्रात वापरेल. भारतीय रोजगार सुरक्षित आणि कायदेशीर असेल.

कामगार एका देशातून दुसऱ्या देशात मुक्तपणे आणि सहजपणे जाऊ शकतील. हा या कराराचा उद्देश आणि सार आहे. युक्रेनमधील युद्ध आणि पाश्चात्य निर्बंधांमुळे रशियामध्ये कामगार संकट निर्माण झाले आहे, त्यामुळे रशियाला हा करार ताबडतोब लागू करायचा आहे. दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहे.

दरम्यान, भारतातील ६५% लोकसंख्येचे सरासरी वय ३५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी आहे. भारतात बेरोजगारी हा एक गंभीर आणि संवेदनशील मुद्दा आहे. या नियुक्त्या आणि करार रशियामध्ये सरकारी पातळीवर केले जातील. या नियुक्त्यांना स्थलांतर समजू नये. गरजेनुसार नियुक्त्या तात्पुरत्या किंवा दीर्घकालीन असू शकतात.

सामाजिक सुरक्षेव्यतिरिक्त, रशियामधील भारतीय कामगारांना विमा, आरोग्यसेवा आणि कायदेशीर संरक्षण देखील प्रदान केले जाईल. कामगारांना पुरेसा रोजगार आणि वेतन मिळावे यासाठी रशिया भारतीय आयटीआय, अभियांत्रिकी पदवी आणि डिप्लोमा तसेच व्यावसायिक कौशल्यांना देखील मान्यता देईल.

या करारामुळे भारताला रोजगाराच्या संधींसह असंख्य फायदे मिळतील. सध्या, १००,००० हून अधिक भारतीय रशियामध्ये स्थायिक आहेत, विविध व्यवसायांमध्ये काम करतात. रशियाच्या सायबेरियन प्रदेशात ३००,००० हून अधिक चिनी कामगार आणि व्यवसाय सक्रिय आहेत. त्यांनी रशियन महिलांशीही लग्न केले आहे.



अॅड. आकाश सपेलकर
वकील सर्वोच्च न्यायालय

रशियाला त्यांच्या एका प्रांतात परदेशी लोकसंख्या वाढून स्थायिक व्हावी असे वाटत नाही. रशियालाही आपली जातीयता बिघडू नये असे वाटत आहे. चीन रशियाच्या सर्वोत्तम मित्र देशांपैकी एक असला तरी, वांशिकतेवर आधारित रशियन आणि चिनी लोकांमध्ये लक्षणीय फरक आहेत. रशियाने भारतीय कामगारांना कामावर ठेवण्याचा निर्णय घेण्याचे हे देखील एक कारण आहे.

हे कामगार रशियाच्या अनेक प्रदेशांमध्ये पसरले जातील, ज्यामुळे लोकसंख्येला चांगला समतोल मिळेल. खरं तर, रशिया भारतासाठी एक अर्थपूर्ण बाजारपेठ म्हणून उदयास येईल. या करारामुळे आपल्या देशाचा परकीय चलन साठा देखील मजबूत होईल, कारण भारतीय कामगार रशियामध्ये कमावलेले पैसे भारतात पाठवतील. रशियामध्ये पगार भारतापेक्षा खूप जास्त आहेत.

करारानंतर, भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असेल. एक अधिकृत पोर्टल असेल. बेकायदेशीर एजंटांचा व्यवसाय थांबेल आणि भारतीय तरुणांचे जीवन धोक्यात येणार नाही. इतकेच नाही तर रशिया मेक इन इंडिया साठी बाजारपेठ देखील प्रदान करेल.

जेव्हा भारतीय कामगार रशियाला जातील तेव्हा भारतीय उत्पादनांची मागणी देखील वाढेल, ज्यामुळे आपली निर्यात वाढेल. आपल्या कामगारांना गवंडी, इलेक्ट्रिशियन, वेल्डर आणि रंगकाम करणारे म्हणून भरपूर नोकऱ्या मिळतील, कारण त्यांना रशियामध्ये जास्त मागणी आहे. तेल आणि वायू क्षेत्रात काम करण्याच्या संधी उपलब्ध होतील.

रशियाला आयटी आणि बँकिंग क्षेत्रात खूप प्रतिभांची गरज आहे. रशियालाही खूप सॉफ्टवेअर अभियंत्यांची गरज आहे. एकंदरीत, भारतीय कामगार आणि व्यावसायिकांसाठी रशिया नवीन अमेरिका म्हणून सिद्ध होऊ शकतो. आखाती देशांच्या तीव्र उष्णतेच्या आणि सरंजामी संस्कृतीच्या तुलनेत, रशिया एक चांगले व्यासपीठ म्हणून सिद्ध होऊ शकते.

एकदा हा करार लागू झाला की, रशियन व्हिसा मिळविण्याची प्रक्रिया तुलनेने सोपी आणि सोपी होईल. भारत-रशिया संबंध हे जागतिक राजकारणातील स्थिर मैत्रीचे उदाहरण आहेत, जे वेळ, परिस्थिती आणि जागतिक दबाव असूनही कधीही कमकुवत झाले नाही.

मोदींनी पुतिन यांचे वैयक्तिकरित्या स्वागत केले, जे या संबंध आणि मैत्रीची खोली दर्शवते. भारत आणि रशियाने परस्पर व्यापार वाढवणे आणि भारताच्या दृष्टिकोनातून तो संतुलित करणे आवश्यक आहे.

## वाचक लिहितात

### एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी पक्षातील तृणमूल कॉंग्रेसचे आमदार मदन मित्रा यांचे वक्तव्य 'राम हिंदू नव्हते तर मुसलमान होते '.

देशभरात चर्चा आणि वाद निर्माण झाला. भगवान रामांविषयी केलेले विधान केवळ एक वैयक्तिक मत म्हणून न राहता, समाजातील श्रद्धा, इतिहास आणि राजकीय संवेदनशीलता यांना स्पर्श करणारे आहे. भारतीय संस्कृतीत श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचेच नव्हे, तर नैतिक मूल्यांचे, आदर्श जीवनाचे प्रतीक मानले जातात. अशा व्यक्तिमत्त्वाबाबत केलेली कोणतीही सार्वजनिक टिप्पणी ही अत्यंत जबाबदारीने करायला हवी. मात्र, या प्रकरणात तसे झाले नसल्याची भावना अनेक नागरिकांमध्ये दिसून येते.

या वक्तव्यावरून तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात असून, अशा विधानांमुळे भारतीय इतिहास व सांस्कृतिक परंपरेचा अवमान होतो, असा आरोप केला आहे. यामागे केवळ व्यक्तीगत अज्ञान नसून, एका विशिष्ट वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब दिसते, असेही मत व्यक्त करण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेकडेही लक्ष वेधले जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर त्यांची स्पष्ट प्रतिक्रिया न आल्याने, सार्वजनिक जीवनातील जबाबदारी आणि मौन याविषयी प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, संबंधित आमदारांनी आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत स्पष्टीकरण दिले आहे. मात्र, सार्वजनिक व्यासपीठावरून केलेल्या विधानांचे परिणाम केवळ शब्दांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर समाजमनावर त्याचा खोल प्रभाव पडतो, हे विसरून चालणार नाही. अशा घटनांमधून एक गोष्ट प्रकर्षाने अधोरेखित होते–राजकारण करताना श्रद्धा, इतिहास आणि समाजभावना यांचा आदर राखणे ही केवळ अपेक्षा नव्हे, लोकप्रतिनिधींची नैतिक जबाबदारी आहे.

■ डॉ. स्वाती देशमुख, नागपूर.

### समाजसेवी संस्था काय करतात?

गेल्या काही दिवसांपासून विदर्भात थंडीचा कडाका वाढला असून, नागपूर शहरातही सर्वत्र हुडहुडी भरल्याचे चित्र आहे. कडाक्याच्या थंडीमुळे काही लोकांचा मृत्यू झाल्याचे वृत्तपत्रातून वाचायला मिळाले. अर्थात, थंडीमुळे जीव गमावणारे कुणी सधन कुटुंबातील नाहीत तर भिक्षेकरी, निराधार असल्याचे समजते. अनाथ, निराधार, निराश्रीत वृद्धांसाठी आश्रयगृह, बाल सदन चालवणाऱ्या अनेक संस्था आहेत. समाजातून ते मोठ्या प्रमाणात दान गोळा करतात, शासनाकडूनही अनुदान लाटतात. या पैशाचा खरेच सदुपयोग होतो का? हा संशोधनाचा विषय आहे. रात्रीच्या वेळी कडाक्याच्या थंडीत गारठून बसलेल्या अशा निराधारांना आधार देण्याचे काम का केले जात नाही? त्यांना ब्लँकेट वगैरे पुरवण्याचे काम या संस्था का करीत नाही.?

■ राजेश वाकोडे, नागपूर.

# पपई खाल्ल्यामुळे फॅटी लिव्हरचा त्रास कमी होतो का?



खराब आहार, व्यायामाची आणि जीवनशैलीच्या खराब सवयींमुळे फॅटी लिव्हरचा आजार वाढत आहे. या डिसऑर्डरचे निदान झालेले बरेच लोक स्वतः ला विचारतात की कोणते पदार्थ खावे आणि इतरांनी टाळावे. फळे सामान्यतः निरोगी मानली जातात.

परंतु प्रत्येक फळाचा यकृताच्या आरोग्यावर समान परिणाम होत नाही. मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणार्या उष्णकटिबंधीय फळांपैकी एक म्हणजे पपई, जे सामान्यतः फॅटी यकृताच्या रूग्णांमध्ये चिंता निर्माण करते. पपई फॅटी यकृत रोगास प्रतिबंधित करते किंवा ट्रिगर करते? प्रश्न असा आहे की, आपण जितके जास्त खावाल, तितके आपण ते अधिक खाऊ आणि सामान्य आहार. फॅटी लिव्हर हा एक आजार आहे जो यकृत पेशींमध्ये चरबीच्या अत्यधिक संचयनामुळे परिणामांशी संबंधित आहे.

फॅटी लिव्हरचा त्रास लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉल, तसेच जास्त प्रमाणात मद्यपान किंवा अस्वास्थ्यकर आहारामुळे उद्भवू शकतो. फॅटी लिव्हर त्याच्या सुरुवातीच्या काळात कोणत्याही लक्षणांशी संबंधित नाही; तथापि, लक्ष न दिल्यास, यामुळे यकृताची जळजळ आणि गंभीर गुंतागुंत होऊ शकते. फॅटी लिव्हर रोगाच्या उपचार आणि उलट करण्यासाठी आहार हा एक अतिशय महत्वाचा पैलू आहे. माफक, फॅटी लिव्हर असलेल्या व्यक्तींसाठी पपई उपयुक्त ठरू शकते.

पपईमध्ये कमी कॅलरी असतात आणि पचण्यास सोपे आहे, याशिवाय समृद्ध अँटीऑक्सिडेंट्स आहेत जे सामान्य पचनास मदत करतात. पपईमध्ये पपैनसारख्या एन्झाइम्समध्ये देखील असतात, ज्यामुळे पचन प्रक्रिया सुलभ होते आणि यकृतावरील भार कमी होतो.

पपईमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आहे ही वस्तुस्थिती आतड्यांच्या आरोग्यास देखील मदत करते, म्हणूनच अप्रत्यक्षपणे यकृताची प्रभावीता वाढते, कारण यामुळे चयापचय सुधारते आणि चरबी तयार होते. पपई हा काही पोषक तत्वांचा स्त्रोत आहे जो यकृताच्या देखभालीस मदत करू शकतो. यात मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि अँटीऑक्सिडेंट्स असतात जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात. यकृत पेशींचे नुकसान टाळण्यासाठी अशा अँटि ऑक्सिडंट्सचा वापर केला जाऊ शकतो. चांगले पचन पपईला देखील चालना देते, जे सूज येणे कमी करण्यास आणि पौष्टिक शोषण वाढविण्यास मदत करते.

पपईमध्ये नैसर्गिकरित्या चरबी कमी असते आणि जोपर्यंत एखाद्याने त्याचे मध्यम प्रमाणात सेवन केले नाही तोपर्यंत फॅटी यकृत-अनुकूल आहारात समाविष्ट केले जाऊ शकते. पपई फायदेशीर आहे, परंतु मोठ्या प्रमाणात सेवन केल्यास ते धोकादायक ठरू शकते. पपईचे जास्त सेवन केल्याने साखरेच्या वापराची पातळी वाढू शकते ज्यामुळे मधुमेहावरील रामबाण उपाय प्रतिकार उत्तेजित होऊ शकतो, जो फॅटी यकृत रोगात प्रचलित गुंतागुंत आहे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### स्वच्छता अभियान?

योजना राबवाव्या काटेकोर
जनतेनेही रहावे दक्ष
तेंव्हा स्वच्छता अभियानाचे
सफल होईल लक्ष ..

हातात घेतात खराटा
फोटो घेतात काढून
कशाला हवं तुम्हाला
पेपरात फोटो छापून?

तुमच्या ह्या नवटंकीनच
योजनांचे वाजले की बारा
गाडगेबाबांच्या
पुण्यतिथी पर्वावर
बदलाना विचारधारा

# सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५: तरूण नवप्रवर्तक एआयचा वापर करत भारतातील आरोग्य, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणार

**मुंबई, १९ डिसेंबर :** आरोग्यसेवेमध्ये तंत्रज्ञानाची भूमिका फक्त भविष्याकरिता मर्यादित राहिलेली नसून आज रूग्णांसाठी निदान, देखभाल आणि प्रतिष्ठेला नवीन आकार देत आहे. सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो (एसएफटी) २०२५ या सॅमसंगच्या प्रमुख शिक्षण उपक्रमाने आयआयटी दिल्लीसोबत सहयोगाने हे परिवर्तन दाखवले, जेथे देशभरातील हजारो विद्यार्थ्यांना थीम 'फ्यूचर ऑफ हेल्थ, हायजिन अँड वेलबिंग'अंतर्गत एआय-फर्स्ट, मानव-केंद्रित सोल्यूशन्स डिझाइन करण्याचे आव्हान दिले.

या नाविन्यतेचे स्वरूप पुढीलप्रमाणे:

१. वास्तविक जीवनातील आव्हानांचे निराकरण करण्याचा प्रयत्न

विद्यार्थ्यांना स्वच्छता, आरोग्य, पोषण, भावनिक स्वास्थ्य आणि प्रतिबंधात्मक केअरमधील समस्यांचे निराकरण करणारे सहजसाध्य आरोग्यसेवा तंत्रज्ञान निर्माण करण्यास आवाहन करण्यात आले, ज्यामधून आरोग्याबाबत उत्तम सुविधा मिळणे विशेषाधिकार नसून अधिकार असल्याची खात्री मिळाली.

२. उज्ज्वल भविष्यासाठी व्यावहारिक सोल्यूशन्स

ऑलकेमिस्ट, बीआरएचएम, हीअर ब्राइट, पिंक ब्रिगेडियर्स यांसारख्या टीम्सनी विविध नाविन्यता सादर केल्या, जसे मल्टी-आर्टिक्युलेटेड बायोनिक हँड्स, लवकर निदान करणारे एआय टूल्स, भविष्यसूचक ब्रेस्ट हेल्थ ॲप्स आणि भारतातील विविध भाषांनुसार डिझाइन करण्यात आलेले स्पीच रेकग्निशन डिवाईसेस. या सर्व नाविन्यतांमध्ये देखभालीदरम्यान निष्ठा व सुलभ सुविधा देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

ऑलकेमिस्ट (आंध्रप्रदेश) - सिलिकोसिसचे निदान करण्यासाठी सखोल लर्निंग मॉडेल असलेला एआय-समर्थित प्लॅटफॉर्म.

बीआरएचएम (उत्तर प्रदेश) - विकलांग व्यक्तींना पुन्हा हालचाल करण्यास मदत करणारा कमी खर्चिक बायोनिक हँड.

हीअर ब्राइट (दिल्ली) - एआय-समर्थित ग्लासेस (चष्मे), जे श्रवणदोष असलेल्या व्यक्तींसाठी संभाषणाला मजकूरामध्ये बदलतात.

पिंक ब्रिगेडियर्स (ओडिशा) - महिलांसाठी भविष्यसूचक एआय ॲप, जे त्यांना स्वत:हून त्यांच्या स्तनाच्या आरोग्याची तपासणी करण्यास मदत करते, तसेच उत्तम निष्पत्तींची खात्री देते.

३. थीम विजेता - पॅरास्पीक: बोलताना अडचण येणाऱ्यांना साह्य

चार राष्ट्रीय विजेत्यांपैकी पॅरास्पीकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गुरूग्राममधील १६ वर्षीय विद्यार्थी प्रणित खेतानने डिझाइन केलेले हे सुसंगत एआय डिवाईस आहे, जे बोलताना अडचण येणाऱ्या व्यक्तींचे उच्चार स्पष्ट व अस्खलित करते, ज्यामध्ये हिंदी भाषेचा समावेश आहे. बोलताना अडचण येणाऱ्या व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करण्यामधून प्रेरणा घेत प्रणितने डायसार्थिक हिंदीसाठी भारतातील पहिले डेटासेट डिझाइन केले, ज्यासह एआय आरोग्यसेवेमधील मोठी तफावत दूर केली.

४. आरोग्य व स्वास्थ्याव्यतिरिक्त इतर विजेते नाविन्यता

एसएफटी २०२५ मध्ये पुढील नाविन्यतांना देखील सन्मानित करण्यात आले:

नेक्स्टप्ले.एआय - एआय क्रीडा प्रशिक्षण प्लॅटफॉर्म

पर्सिव्हिया - एआय-समर्थित ग्लासेस

पृथ्वी रक्षक - गेमिफाईड सस्टेनेबिलिटी ॲप

५. विकास करण्यासह यशस्वी होण्यासाठी पाठिंबा

विजेत्यांना आयआयटी दिल्लीमध्ये जवळपास १ कोटी रूपये इन्क्यूबेशन सपोर्ट मिळाले, तसेच टॉप टीम्सना अतिरिक्त पुरस्कार मिळाले, जसे १ लाख रूपये अनुदान, गुडविल अवॉर्ड्स आणि यंग इनोव्हेटर अवॉर्ड्स. टॉप २० टीम्सना सॅमसंग गॅलेक्सी झेड फ्लिप स्मार्टफोन देण्यात आले.

६. विकसित होत असलेली, सर्वसमावेशक नाविन्यता परिसंस्था

एसएफटी २०२५ मध्ये द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधून मोठ्या प्रमाणात सहभागी दिसण्यात आले, तसेच माजी विद्यार्थी मार्गदर्शक म्हणून परत आले आणि प्रोटोटाइपिंगसाठी आयआयटी दिल्लीची एफआयटीटी लॅब्स उपलब्ध करून देण्यात आली. या विकासामधून शहरी भागांपलीकडे दर्जेदार एसटीईएम शिक्षण उपलब्ध करून देण्याप्रती कटिबद्धता दिसून येते. २०१० पासून ६८ शहरांमधील २.९ दशलक्ष तरूण नवप्रवर्तक सामील होण्यासह एसएफटीने भारतातील समस्या निवारकांच्या भावी पिढीला आकार देणे सुरू ठेवले आहे.

७. सहानुभूती व जबाबदारीमधून प्रेरित

डिझाइन-थिंकिंग वर्कशॉप्सनी विद्यार्थ्यांना एआय सोल्यूशन्स निर्माण करण्यास प्रेरित केले, जे वास्तविक समस्यांचे जबाबदारीने निराकरण करतील, तसेच झपाट्याने विकसित होत असलेल्या डिजिटल विश्वामध्ये सामाजिक गरजांनुसार नाविन्यता आणतील.

# इंडसइंड बँकेकडून महिला टी-२० वर्ल्ड कपमधील ऐतिहासिक विजयाबद्दल भारतीय महिला अंध क्रिकेट संघाचा सन्मान




**मुंबई, १९ डिसेंबर :** इंडसइंड बँकेने आज महिला अंध क्रिकेटमधील ऐतिहासिक कामगिरीचा गौरव करत पहिल्या महिला टी-२० अंध क्रिकेट विश्वचषकातील विजयाबद्दल भारतीय महिला अंध क्रिकेट संघाचा विशेष सत्कार सोहळा आयोजित केला.

या उपक्रमांतर्गत इंडसइंड बँक क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडिया (सीएबीआय) यांच्या सहकार्याने जे समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डचे क्रिकेटविषयक अंग व उपक्रम आहेआपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत भारतीय अंध क्रिकेट संघासह पुरुष व महिला मिळून ७०० हून अधिक अंध क्रिकेटपटूंना सातत्याने पाठबळ देत आहे.

कार्यक्रमात बोलताना इंडसइंड बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (एमडी ॲण्ड सीईओ) राजीव आनंद म्हणाले, भारतीय महिला अंध क्रिकेट संघाने विश्वचषकात मिळवलेला हा ऐतिहासिक विजय भारतातील सर्वसमावेशक क्रीडेसाठी एक निर्णायक क्षण आहे. इंडसइंड बँकेतर्फे या यशाचा गौरव करताना आम्हाला अभिमान वाटतो आणि संघाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. सीएबीआय सोबतच्या आमच्या भागीदारीतून व्यक्तींना सक्षम बनवणारी, आत्मविश्वासाने पुढे नेणारी आणि सर्वांना संधी देणारी मजबूत, समावेशक व्यवस्था उभारण्याच्या आमच्या ध्येयाशी आम्ही ठामपणे बांधील आहोत.

यावेळी क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडिया (सीएबीआय) चे अध्यक्ष तसेच समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डचे संस्थापक व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. महांतेश किवडसन्नावर म्हणाले, इंडसइंड बँकेसोबतच्या आमच्या दशकभराच्या भागीदारीचा सीएबीआय आणि समर्थनम ट्रस्टला प्रचंड अभिमान आहे. या सहकार्यातून आम्ही केवळ अंध क्रिकेटला प्रोत्साहन दिले नाही, तर त्याचे रूपांतर घडवून आणलेसार्वजनिक जागरूकता वाढवली, खेळाडूंना ओळख मिळवून दिली आणि सरकारी नोकऱ्या व रोख बक्षिसांच्या संधी उपलब्ध करून दिल्या. आज अंध क्रिकेट ज्या उंचीवर पोहोचले आहे, त्यामागे इंडसइंड बँकेचे सातत्यपूर्ण आणि निष्ठावान पाठबळ आहे; त्याबद्दल आम्ही मनापासून कृतज्ञ आहोत.

# बिर्ला ओपस पेंट्स : भारतातील १० हजारांहून अधिक शहरांत वाढवले आपले अस्तित्व आणि ब्रॅन्ड इक्विटी

**मुंबई, १९ डिसेंबर :** आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम इंडस्ट्रीज च्या अंतर्गत असलेल्या बिर्ला ओपस पेंट्स ने राष्ट्रीय स्तरावरील आपले अस्तित्व वाढवणे सुरु ठेवले असून यामध्ये ग्राहकांची वाढती मागणी आणि डिलर्स च्या शृंखलेचे अनमोल योगदान आहे. डेकोरेटिव्ह पेंट्स क्षेत्रात प्रवेश केल्यापासून अगदी दीड वर्षांच्या काळात कंपनीने देशातील सर्वात मोठे वितरण आणि सेवा नेटवर्क सुरु केले, यामध्ये १४० डेपोज, सर्वात मोठे फ्रॅन्चाईज स्टोअर नेटवर्क आणि १० हजारांहून अधिक शहरांचा समावेश आहे. वेगाने झालेली ही वाढ सातत्याने असलेली उपलब्धता आणि वेगवान सेवेमुळे बाजारपेठेतील वाढती मागणी यामुळे पूर्ण होऊ शकली आहे.

ब्रॅंडच्या १९० हून अधिक उत्पादनांच्या आणि १,७५० हून अधिक एसकेयू च्या पोर्टफोलिओमुळे तसेच प्रीमियम आणि लक्झरी मिक्सने ६५ टक्क्यांहून अधिक महसूल दिला, त्यामुळे बाजारपेठांमध्ये उत्सवाच्या हंगामात चांगली मागणी निर्माण झाली. ब्रॅंडची स्थिर वाढ शहरी भारतातील टॉप-ऑफ-माइंड रिकॉलमध्ये नंबर दोन डेकोरेटिव्ह पेंट्स ब्रॅंड म्हणून त्याच्या स्थानावरून दिसून येते ही वाढ सुरुवात झाल्यापासून केवळ दीड वर्षांत साध्य झाली. बिर्ला ओपस अ‍ॅश्युरन्स, एक वर्षाच्या मोफत रीपेंटिंग वचनासारख्या उपक्रमांद्वारे ग्राहकांचा विश्वास निर्माण करण्यावर कंपनीचे लक्ष ब्रॅंडवरील विश्वास वाढला.

२०२६ मध्ये बिर्ला ओपस पेंट्स गतीशीलतेने वाढीची योजना आखत आहे. खरगपूर येथे त्यांच्या सहाव्या उत्पादन केंद्रा च्या सुरुवाती मुळे कंपनीची आताची एकूण क्षमता १,३३२ एमएलपीए ची झाली असून यामुळे कंपनी भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी पेंट उत्पादक कंपनी बनली आहे. त्यामुळे कंपनीचा क्षमतेचा हिस्सा हा २४ टक्के बनला आहे. कंपनी चे काम सुरु केल्या पासूनचे हे तिसरे वर्ष असून यावेळी कंपनीचा महसूल हा १० हजार कोटी रुपयांवर जाणार आहे. फ्रॅन्चाईजी स्टोअर्स, बाजारपेठेतील खोलवर पोहोच आणि तंत्रज्ञान, शाश्वतता, संशोधन आणि विकास तसेच ब्रॅन्ड कथानक यांच्यातील सातत्यपूर्ण वाढ या गोष्टी २०२६ मध्ये कंपनीच्या वाढीस योगदान देतील.

ग्रासीम चे एमडी आणि बिर्ला ओपस पेंट्सचे बिझनेस हेड हिमांशु कपानिया यांनी सांगितले सणासुदीच्या दिवसातून हे सिध्द झाले की ग्राहक आणि विक्रेत्यांनी बिर्ला ओपस पेंट्स वरील दृढ विश्वास अधोरेखित केला आहे. राष्ट्रीय स्तरावरील आमच्या सक्षम कार्यक्षमतेमुळे भारतातील सर्वाधिक विश्वसनीय आणि भविष्यासाठी तयार इकोसिस्टम मुळे आवाका, सेवा आणि नाविन्यात भर पडली आहे. अमाची क्षमता ही देशातील सर्वाधिक मोठ्या क्षमतांपैकी एक असून आम्ही २०२६ मध्ये प्रवेश करतांना आत्मविश्वासाने प्रवेश करत आहोत. आमचे उद्दिष्ट्य हे राहणार आहे की भारतीय पेंट्स ची पध्दती बदलून प्रत्येक घर हे दुनिया को रंग दो या घोषवाक्यानुसार असेल.

# भारती एअरटेल कंपनीच्या नेतृत्वबदलाची घोषणा



**नवी दिल्ली, १८ डिसेंबर :** गेल्या १३ वर्षांपासून गोपाळ विठ्ठल यांनी भारती एअरटेलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी पदाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. ऑक्टोबर २०२४ रोजी कंपनीच्या सुनियोजित उत्तराधिकार प्रक्रियेचा भाग म्हणून गोपाळ विठ्ठल यांची भारती एअरटेलच लिमिटेडच्या उपाध्यक्षपदीदेखील नियुक्ती करण्यात आली होती. या बदल पक्रियेचा भाग म्हणून आता कंपनीच्या नेतृत्वात बदल करण्यात आले आहेत. गोपाल विठ्ठल यांच्याजागी शाश्वत शर्मा यांची कंपनीचे नियोजित मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या वर्षात शर्मा या नव्या पदाचा कार्यभार स्विकारतील.

व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वीरित्या काम पाहणा-या गोपाल विठ्ठल यांची पदोन्नती झाल्याचे कंपनीच्यावतीने जाहीर करण्यात आले आहे. १ जानेवारी २०२६ पासून गोपाळ विठ्ठल कंपनीच्या कार्यकारी उपाध्यक्ष पदाची सूत्रे सांभाळतील. गोपाळ विठ्ठल यांच्याकडे भारती एअरटेलसह कंपनीसह सर्व उपकंपन्यांच्या कामकाजाचे नेतृत्व आणि देखरेख करण्याची महत्त्वाची जबाबदारी असेल.

सध्या सौमेन रे हे भारती एअरटेल इंडियाचे मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून काम पाहत आहे. येत्या काळात सौमेन रे यांची समूहाच्या मुख्य आर्थिक अधिकारी या पदावर नेमणूक केली जाईल. गोपाळ विठ्ठल यांच्या मार्गदर्शनाखाली सौमेन रे नव्या पदाचे कामकाज पाहतील. सौमेन रे यांनी गेल्या चार वर्षांपासून मुख्य आर्थिक अधिकारी पदाची धूरा अत्यंत यशस्वीपणे सांभाळली आहे.

कंपनीचे फायनान्शिअल कंट्रोलर म्हणून काम पाहणा-या अखिल गर्ग यांची भारती एअरटेल इंडियाचे मुख्य आर्थिक अधिकारी म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. गर्ग गेल्या १२ वर्षांपासून कंपनीच्या कामकाजात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. या काळात त्यांनी कंपनीच्या विविध विभागांमध्ये महत्त्वाच्या जबाबदा-या पार पाडल्या आहेत.

सध्या रोहित पुरी हे संयुक्त कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी म्हणून कार्यरत असून, त्यांचीही पदोन्नती जाहीर करण्यात आली आहे. पुरी आता कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी म्हणून सर्व कामकाज पाहतील. ग्रुप कंपनी सचिव पंकज तिवारी हे गट स्तरावर आपले नेतृत्व आणि देखरेख कायम ठेवणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या धोरणात्मक कामकाजाची प्रक्रिया सुरु राहील.

कंपनीच्या नेतृत्वबदलाबद्दल भारती एअरटेलचे अध्यक्ष सुनील भारती मित्तल यांनी समाधान व्यक्त केले. कंपनीच्या विविध पदांच्या यशस्वी हस्तांतराबद्दल भाष्य करताना ते म्हणाले की, एअरटेलमधील नेतृत्वाचा वारसा सोपवण्याची ही प्रक्रिया ज्या पद्धतीने पार पडली, त्याबद्दल मला अतिशय आनंद वाटत आहे. बदल आणि सातत्य हे दोन्ही एकत्रितपणे पुढे नेण्याचा यापेक्षा योग्य काळ असू शकत नाही. मला ठाम विश्वास आहे की, गोपाळ आणि शाश्वत हे दोघे भविष्यातही कंपनीच्या प्रगतीचा आणि यशाचा वेग कायम ठेवतील. मी दोघांनाही नवीन जबाबदा-यांसाठी मनापासून शुभेच्छा देतो.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्ती आणि तितली यांच्यातील वाढता स्नेह पाहून अस्वस्थ झालेल्या कादंबरीने चाळ सोडून जायचे ठरवले



**मुंबई, १८ डिसेंबर :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील विविध कथाबंधांची गुंफण, भावनिक नातेसंबंधांचे चित्रण, छुपी रहस्ये आणि नैतिक दुविधा यांच्यामुळे प्रेक्षक या कथानकाशी खिळून राहिला आहे. या कथानकाच्या मुळाशी पुष्पा (करुणा पांडे) ही धडाडीची स्त्री आहे, जिची हिंमत आणि अंतःप्रेरणा यामुळे पुन्हा काही रहस्यांचा उलगडा होऊन त्यामुळे काही आयुष्ये पालटून जाणार आहेत.

या आठवड्यात, राशीचा (अक्षया हिंदळकर) साखरपुडा आणि सोलगेट कंपनीतील संकटाच्या गोंधळात आणखी एक रहस्य उघड होण्याच्या तयारीत आहे. प्रेक्षक बघतील की, तितली (भूमी रमोला) ची दीप्तीकडे असलेली ओढ पाहून कादंबरी (वृंदा त्रिवेदी) दिवसेंदिवस जास्त अस्वस्थ होत आहे. आपले रहस्य जाणणारी रेखाबेन कधीतरी सगळ्यांच्या समोर येईल या भीतीने आणि मुळात रेखाबेन अजून जिवंत आहे हे कळल्यावर कादंबरीला मोठा धक्का बसला आहे आणि तिच्यातील संशय आणि भ्रम परकोटीला पोहोचला आहे. विविध सुगावे, चित्रे आणि साखरपुड्याच्या दिवसाचा धक्कादायक व्हिडिओ या सगळ्यांचा एकत्रित अर्थ लावण्याचा प्रयत्न करत असलेल्या पुष्पा आणि जुगल (अंशुल त्रिवेदी) यांना कादंबरी आणि रेखाबेन यांच्यात काही तरी दुवा असल्याचे लक्षात येते. इकडे, कादंबरी तितलीच्या सुरक्षेची काळजी वाटून आणि तितली आणि दीप्ती (दीक्षा जोशी) यांच्यातील वाढता स्नेह पाहून बापोद्रा चाळ सोडून वावडी गावाला परत जाण्याचा निर्णय घेते. पण तितलीने हट्ट धरला आहे. ती आईसोबत परत जाण्यास नकार देते आणि दीप्तीसोबत राहण्यास तयार होते, त्यामुळे कादंबरीला आणखीनच धक्का बसतो आणि एकाकी वाटते.

पुष्पाच्या हे ध्यानात आले आहे की, कादंबरीचे रहस्य आपल्याला वाटते त्यापेक्षा जास्तच गहन आहे. त्यामुळे आता हा प्रश्न उपस्थित होतो की: या भावनिक आवेगामुळे सत्य उघड होईल का?

कादंबरीची भूमिका करत असलेली वृंदा त्रिवेदी म्हणते, कादंबरी अशी स्त्री आहे, जी आयुष्यभर एक गुपित सांभाळत जगली आहे, त्यामुळे प्रत्येक निर्णय घेताना ती मनातून धास्तावलेली असते. तितली आणि दीप्तीची जवळीक पाहून ती हादरून जाते कारण जी गोष्ट आपल्या नियंत्रणात आहे असे तिला वाटत होते ती देखील आता तिच्या हातातून निसटून जात आहे. चाळ सोडून जाण्याचा निर्णय तिने संतापाच्या भरात घेतलेला नाही तर गडबडीत, अपराधी भावनेतून आणि आपले बिंग फुटण्याच्या भीतीतून घेतला आहे. प्रेक्षक कादंबरीची एक हळवी, दुखरी बाजू या भागांमध्ये बघतील.

# सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विताने पर्सीच्या कॅफेचा ताबा घेतला, आता नात्यांची कसोटी होणार

**मुंबई, १९ डिसेंबर :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)ची गोष्ट सांगितली आहे. अन्विता आता केवळ जगण्याचा नाही, तर स्वतःच्या जीवनाचा विचार करू लागली आहे. संजय (ऋषी सक्सेना) च्या मनातील वाढती असुरक्षितता आणि विराटच्या (रजत वर्मा) वागण्याचा उलगडा होत नसल्याने तिची स्थिती गोंधळलेली आहे. त्यातच रजतचे वडील राजनाथ वर्मा (फारूख सईद) यांच्या आग्रही स्वभावामुळे गुंतागुंत आणखी वाढली आहे. अन्वितावर निवड करण्याची पाळी आली आहे आणि त्यात तिच्या सक्षमतेची आणि नात्यांची परीक्षा होणार आहे.

कथानक पुढे सरकले आहे आणि आता अन्विताने पर्सीज कॅफेचा ताबा घेतला आहे. आता तिच्यातील आत्मविश्वास आणि स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती उठून दिसू लागली आहे. पण, यामुळे संजयशी तिचे खटके उडू लागले आहेत. त्याच्यात असुरक्षिततेची भावना असल्यामुळे अन्विताच्या उत्कर्षाचा तो विपर्यास करतो तसेच त्याला विराटच्या आसपास असण्यातही धोका जाणवत राहतो. एका भव्य पार्टीत विराटचे वडील राजनाथ वर्मा यांची एंट्री होते. मालिकेतील नाट्य आणखी वाढते, जेव्हा विराट सांगतो की त्याने कॅफेची मालमत्ता विकत घेतली आहे आणि अन्विताला तो मालमत्ता खाली करण्याची धमकी देतो. अन्विताला नव्याने गवसलेली ताकद तिची स्वप्ने आणि तिची नाती यांचे रक्षण करू शकेल का?

अन्विताची भूमिका करणारी सुंबुल तौकीर खान म्हणते, अन्वितासाठी हा टप्पा खूप ताकदीचा आहे. कारण आता ती केवळ जगण्यासाठी नाही तर आपल्या जीवनाला आकार देण्यासाठी धडपडते आहे. यामध्ये गुंता हा आहे की, तिच्या उत्कर्षाचे आकलन योग्य पद्धतीने केले जात नाहीये. आणि तिचीच जवळची माणसे तिला आव्हान देत आहेत. या प्रवासात अन्विता साकारणे जरा कठीण पण समाधान देणारे आहे, कारण ती आता हळवी आहे, तितकीच दृढ आहे आणि स्वतःचे स्थान निर्माण करत आहे. प्रेक्षकांना ती आधीच्या पेक्षा अगदी वेगळ्या रूपात दिसणार आहे.

## शनिवार दि. २० डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार<br>पत्थर फोड एकच | मुंबई बाजार<br>पत्थर फोड एकच |
|---|---|
| १ ४ ५ ८ | ४ ७ ८ ९ |
| ६७८ १६७ २६७ १७० | ६९९ ७०० १३४ २३४ |
| ११९ ३५६ ७८० २६० | २६६ १६० ३५० ११७ |
| २९० २२० ४५६ ३५० | ७७० २५० ५६७ ३८८ |
| **जोडी** | **जोडी** |
| १२ - ४२ - ५० - ८० | ४० - ७० - ८६ - ९६ |
| १५ - ४५ - ५६ - ८६ | ४१ - ७१ - ८३ - ९५ |
| १९ - ४९ - ५३ - ८३ | ४३ - ७३ - ८२ - ९२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस २० डिसें. २०२५

## शनिवार दि. २० डिसेंबर २०२५

**सर्व बाजार साठी**

३१ - ६१ - ९२ - ०२
३७ - ६७ - ९४ - ०४
३८ - ६८ - ९५ - ०५
--------------------
१५७ - १२३ - १२६ - १३६
३४६ - २६८ - २८९ - ३७०
६८९ - ४५७ - ४७८ - ४६०

**सर्व बाजारासाठी**

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३८ | | १२४ | | ५७७ | | २३५ | | १०० | | २५५ | |
| ५८० | ३ | २५० | ७ | १४४ | ९ | ४७९ | ० | ३९९ | १ | १२९ | २ |
| ४९० | | ३४० | | २७० | | ३८९ | | २९० | | ३०० | |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५६० | | ३६६ | | २७९ | | १५७ | | ६८० | | १४० | |
| ६७८ | १ | ४४७ | ५ | ४६८ | ८ | ४९० | ३ | ३३८ | ४ | २५८ | ५ |
| २२७ | | १२२ | | ३६९ | | २२९ | | ४०० | | ३३९ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

४ ६ ८ ५ ७

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

## राशीभविष्य

**मेष :** तुम्हाला नवीन कॉन्ट्रॅक्ट मिळू शकतं. इतरांशी बोलताना योग्य भाषेचा वापर करा. उगाच भांडण ओढवून घेऊ नका. मन शांत ठेवलं तर तुमचं काम सहज यशस्वी होईल.

**वृषभ :** आजचा दिवस प्रवासात जाईल, धावपळ होईल. हा प्रवास ऑफिसच्या कामाशी संबंधित असू शकतो. तुमच्या प्रवासादरम्यान तुमची एखाद्या दूरच्या नातेवाईकाची भेट होऊ शकते. ज्यामुळे आनंद होईल.

**मिथुन :** आज तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत असेल. या राशीच्या बेरोजगार लोकांना चांगल्या कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळू शकते. कामानिमित्त केलेला प्रवास थकवेल, आरामाची गरज भासेल.

**कर्क :** या राशीखाली जन्मलेल्या लोकांनी त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. हा दिवस नातेवाईकांसोबतच्या नातेसंबंधांना ताजेतवाने करण्याचा देखील आहे.

**सिंह :** या राशीखाली जन्मलेल्या इंजिनिअरसाठी आजचा दिवस फायदेशीर ठरेल. नशीब तुमच्या बाजूने असेल. तुम्ही कामावर अपवादात्मकपणे चांगली कामगिरी कराल. सामाजिक कार्यात आवड वाढेल.

**कन्या :** प्रेमाच्या जोडीदारांचा आजचा दिवस रोमँटिक असण्याची शक्यता आहे. आज कोणतंही पाऊल काळजीपूर्वक उचला, विचार करून निर्णय घ्या. निर्णय घेतानाता हृदयापेक्षा डोक्याचा जास्त वापर करा.

**तुळ :** भविष्यात तुम्हाला फायदा होईल असा व्यवसाय आज सुरू कराल. तुम्ही अनेक कौटुंबिक जबाबदाजया पार पाडाल. या राशीखाली जन्मलेल्या कंत्राटदारांचा दिवस चांगला जाईल.

**वृश्चिक :** आज तुमच्या व्यवसाय योजनेत बदल करणे महत्वाचे आहे. अनुभवी लोकांचे मार्गदर्शन तुमच्या वाढीसाठी उपयुक्त ठरेल. नोकरी करणाजयांना लवकरच स्थलांतर करावे लागू शकते.


**धनु :** तुम्ही घाईघाईने काम केले तर सर्व काही बिघडेल. या राशीच्या अविवाहित लोकांना आज मागणी येऊ शकते. एकेकाळी तुम्ही ज्या प्रयत्नांना व्यर्थ मानत होता ते आज यशस्वी होतील.

**मकर :** आज तुम्ही कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी हाथी घेतलं तर ते सहज साध्य होईल. एखाद्या महत्त्वाच्या कामाच्या पूर्ततेबद्दल लोक तुमचे अभिनंदन करण्यासाठी सतत येत राहतील.

**कुंभ :** आज आनंद मिळवण्यासाठी, तुम्हाला तुमच्या स्वभावात काही बदल करावे लागतील. पण त्यान खुश रहाल, समाधान वाटेल. ज्या गोष्टींसाठी तुम्ही खूप दिवसांपासून प्रयत्न करत आहात ते यशस्वी होईल.

**मीन :** आजचा दिवस आनंदाने भरलेला असेल. तुम्ही गेल्या काही दिवसांपासून जे काम पूर्ण करण्याचा विचार करत होता ते आज कोणाच्या तरी मदतीने पूर्ण होईल. आज इतरांच्या कामावर मत व्यक्त करणं टाळा.

## शब्दकोडे क्रमांक २३०३



**आडवे शब्द :-**


१) ** ** ** ****** ** दादा मला एक वहिनी आण
११) जवळ (हिंदी)
१२) पोत्याचा तुकडा
१३) उष्ण
१४) वस्त्र, कापड
१६) धमनी
१७) लंकेचा राजा
१८) एक फळ
२०) आणि
२१) भयंकर
२२) अंगरखा
२४) कुलीन, खानदानी
२६) अथवा, ऋकिअंजवा
२७) दरवाजा
२८) फुरसत
३०) मऊ
३३) मिठी
३४) पंथ
३५) वृत्तपत्र
३६) मोठी परात
३८) वाईट सवय
४०) मोठी नदी
४३) हस्ते पर हस्ते
४४) चांगली वागणूक,
४६) पुष्कळ
४८) चांदणी
४९) दृष्टीभेट
५३) दीपक
५५) मनाचा ओढा
५६) भविष्य, अंदाज
५८) केव्हा (ग्रामीण)
५९) छोटे वादळ
६१) चित्रपटाचा पडदा
६२) यज्ञात बळी द्यावयाचा माणूस
६३) रानभूल, रस्ता चुकवणारा

**उभे शब्द**

१) श्रीकृष्णाचे एक नाव
२) अस्वल
३) पद्धतशीर
४) झाडाभोवतीचा कट्टा
५) नृत्यकलेचे दैवत
६) संसर्ग
७) तात्पर्य
८) सुंदर युवती
९) सैन्याचा कॅम्प
१०) धमनी
१५) साहित्यातील नऊ भावना
१६) नट्टापट्टा
१९) देवाण-घेवाण
२२) शंकराचे एक नाव
२३) किंमत
२४) निवासस्थान
२५) तंबाखू
२८) मान खाली घातलेला
२९) सगळीकडे
३१) मृत
३२) केर
३३) जास्तीत जास्त आणि कमीत कमी
३७) तलाव
३९) मोठा राजा, सम्राट
४१) दोन मोठे सण
४२) सुवासिक तांदळाची एक जात
४५) आश्चर्य
४७) मातीचा कण
५०) मजबूत, दणकट
५१) जुनाच्या विरुद्ध
५२) खोडण्याचे साधन
५४) संधी, मोका
५५) बांबू
५७) गवंडी
६०) सोन्याचा कस

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# चुरणी गावाचा विकास खुंटला

## ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे मूलभूत सुविधांचा बोजवारा

**मारोती पाटणकर**

**चुरणी, (दि.19)** – विकासाच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही चुरणी गावाचा सर्वांगीण विकास मात्र कागदावरच मर्यादित राहिल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. ग्रामपंचायतीच्या मनमानी आणि निष्क्रिय कारभारामुळे गावातील मूलभूत सुविधा अपुऱ्या असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विशेषत: पाणीपुरवठा आणि अंतर्गत रस्त्यांची दयनीय अवस्था ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम करत आहे.




गावातील अंतर्गत रस्ते मोठ्या प्रमाणात खराब झाले असून पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य असते. याचा सर्वाधिक फटका शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना बसत आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत वारंवार मागणी होऊनही ग्रामपंचायत केवळ आश्वासनांची बोळवण करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, पाणीप्रश्न चुरणीकरांसाठी जळजळीत बनला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून गावात पाणीपुरवठा पूर्णत: खंडित आहे. उन्हाळा असो वा हिवाळा, अनेक वाड्या-वस्त्यांमध्ये नियमित पाणी मिळत नाही. परिणामी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून महिलांना शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी लांब पायपीट करावी लागत आहे. ग्रामपंचायतीकडे चार मोटर्स उपलब्ध असतानाही त्यांचा योग्य वापर न करता नवीन मोटर खरेदीचा प्रस्ताव घेतला जात असल्याने सार्वजनिक पैशांच्या अपव्ययाचा आरोप होत आहे. विकासकामांच्या नावावर निधी खर्च झाल्याचे दाखवले जाते; मात्र प्रत्यक्षात कामांचा दर्जा निकृष्ट असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



ग्रामसभांमध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने ग्रामपंचायतीच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास ग्रामस्थांचा रोष अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### पाणीपुरवठ्यावर संताप

पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. उपलब्ध मोटर्स असूनही नवीन खरेदीचा प्रस्ताव म्हणजे निष्काळजीपणा आणि सार्वजनिक पैशांची उधळपट्टी आहे. घरपट्टी व पाणीपट्टीचा उपयोग कुठे होतो, हा खरा प्रश्न आहे.

**आलोक अलोकार**
**( मंडळाध्यक्ष, भाजप-चिखलदरा उत्तर )**

### चौकशीची मागणी

पाणीप्रश्न हा नैसर्गिक नसून ग्रामपंचायतीतील बेजबाबदार आणि भ्रष्ट कारभाराचा परिणाम आहे. याची तात्काळ चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

**रुपेश भक्ते ( नागरिक, चुरणी ).**

### कुचकामी योजना

कोट्यवधींची पाणीपुरवठा योजना कुचकामी ठरली आहे. हिवाळ्यातही पाणी मिळत नाही, हातपंप नादुरुस्त आहेत. ग्रामपंचायत नागरिकांच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहे.

**नरेंद्र टाले, ( तालुकाध्यक्ष, प्रहार जनशक्ति पक्ष, चिखलदरा )**

# बालविवाह, पॉक्सो प्रकरणाचा तत्पर उलगडा

## एपीआय विना पंडे यांचा सन्मान

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, ( दि.19 )** – 6 डिसेंबर रोजी 19 वर्षीय पीडित महिलेच्या द्वितीय प्रसूतीनंतर उघडकीस आलेल्या गंभीर बालविवाह व पॉक्सो प्रकरणाचा वेळीच आणि प्रभावी तपास करून आरोपीस अटक करण्यात आली. या संवेदनशील प्रकरणात दाखवलेल्या तत्परता, कायदेशीर दक्षता व उत्कृष्ट कामगिरीबद्दल चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक विना पंडे यांचा ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



वैद्यकीय तपासणीत पीडितेचा विवाह सन 2021 मध्ये ती अल्पवयीन असताना झाल्याचे स्पष्ट झाले. यापूर्वीही तिला दोन वर्षांची मुलगी आहे. माहिती मिळताच मोर्शी पोलिसांनी चांदूर रेल्वे पोलिसांशी संपर्क साधला. त्यानुसार पीडितेच्या सज्ञान पतीविरुद्ध भादंवी कलम 376 (2)(एन) तसेच पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली. या कारवाईत एपीआय विना पंडे यांनी पुरावे संकलन व कायदेशीर प्रक्रिया प्रभावीपणे राबवत मोलाची भूमिका बजावली. हा सन्मान पोलीस दलासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे दुर्लक्ष

## नागरिकांचा संताप

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.19 )** – अमरावती जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून ठोस कारवाई होत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषत: मोर्शी तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे, अर्धवट कामे, साईडपट्ट्यांची दयनीय अवस्था, पावसाळ्यात साचणारे पाणी आणि अपघातांना आमंत्रण देणारी रचना यामुळे वाहनधारक व स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत.



महामार्गावरील समस्यांबाबत नागरिकांनी लेखी निवेदने, तक्रारी तसेच ऑनलाईन माध्यमांतून सातत्याने संपर्क साधला. मात्र तक्रारी नोंदवून घेतल्या जात असल्या तरी प्रत्यक्ष दुरुस्ती किंवा सुधारणा होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढले असून रुग्णवाहिका, शालेय वाहतूक आणि शेतमाल वाहतुकीवर विपरीत परिणाम होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, महामार्गावर नियमितपणे टोल वसुली केली जात असताना मूलभूत सुविधा मात्र दिल्या जात नाहीत. खड्डे बुजवणे, साईनबोर्ड, सुरक्षा भिंती, प्रकाश व्यवस्था याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. काही ठिकाणी महिनोन्महिने काम अर्धवट असल्याने वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींवर नेमकी कोणती कारवाई झाली, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी होत आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून जबाबदारी निश्चित करावी, अन्यथा टोल वसुली स्थगित करावी, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.



# हिवरखेडमध्ये गॅस सिलेंडरचा खडखडाट

## नागरिकांचा गॅस एजन्सीवर मोर्चा

महासागर | प्रतिनिधी

**हिवरखेड,( दि.19 )** – मोर्शी तालुक्यातील हिवरखेड व परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. वारंवार बुकिंग करूनही वेळेवर सिलेंडर न मिळाल्यामुळे संतप्त नागरिकांनी आज स्थानिक गॅस एजन्सीवर धडक मोर्चा काढत जोरदार घोषणाबाजी केली.

मोर्चादरम्यान काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांशी उद्धट वर्तन होत असल्याचा आरोप करण्यात आला. 'गाडी आली नाही', 'सिलेंडर संपले' अशी कारणे देत ग्राहकांना टाळले जात असल्याने नागरिक अधिकच संतप्त झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक ग्राहकांनी वेळेत बुकिंग करूनही अद्याप सिलेंडर प्राप्त झालेले नाहीत. काहींनी सिलेंडरमध्ये अर्धा ते एक किलो गॅस कमी असल्याच्या तक्रारी केल्याने वितरणावेळी वजन करून देण्याची मागणी करण्यात आली. मोर्चाच्या वेळी एजन्सी प्रतिनिधींनी नागरिकांशी संवाद साधत कंपनीकडून पुरवठा कमी झाल्यामुळे अडचण निर्माण झाल्याचे सांगितले व लवकरच अतिरिक्त साठा उपलब्ध करून प्रलंबित ग्राहकांना सिलेंडर देण्याचे आश्वासन दिले. एजन्सीच्या आश्वासनानंतर मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला.

# शिराळा येथील बुद्धभूषण वानखेडे यांना आचार्य पदवी

महासागर | प्रतिनिधी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** – तालुक्यातील शिराळा गावातील युवक बुद्धभूषण ज्ञानेश्वर वानखेडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दि. 11 डिसेंबर 2025 रोजी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे पार पडलेल्या 27 व्या दीक्षांत समारंभात त्यांनी मृद विज्ञान (स्थद्बद्य स्द्बद्दठुष्द्ब) या विषयात पीएच.डी. अर्थात आचार्य पदवी यशस्वीरीत्या प्राप्त केली.



कृषी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या मृद विज्ञान विषयात त्यांनी सखोल संशोधन करून ही पदवी मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे शिराळा गावासह संपूर्ण अमरावती तालुका व जिल्ह्याचा गौरव वाढला आहे. बुद्धभूषण वानखेडे हे पत्रकार डी. आर. वानखेडे यांचे पुत्र असून, वडील ज्ञानेश्वर वानखेडे, आई वनमाला वानखेडे, मोठे बंधू सुगत वानखेडे तसेच मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातून उच्च शिक्षण घेऊन आचार्य पदवी संपादन करणे ही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी बाब असून, भविष्यात त्यांच्या संशोधनाचा लाभ शेतकरी व कृषी क्षेत्राला होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# तंटामुक्त, निर्व्यसनी व अंधश्रद्धामुक्त जीवन जगा - प्रमोद पोकळे



महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी ( दि.19 )** – समाजात सौहार्द, शांतता व सलोखा टिकवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मानवजात एकच कुटुंब मानून सर्वांनी गुण्यागोविंदाने नांदत तंटामुक्त, निर्व्यसनी व अंधश्रद्धामुक्त जीवन जगावे, असे आवाहन दूरदर्शन व आकाशवाणीचे लोककलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले. तसेच महिलांनी केवळ 'चूल आणि मूल' यापुरतेच मर्यादित न राहता, देश-धर्म-संस्कृतीच्या रक्षणातही सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश त्यांनी दिला.

श्री समर्थ रामगीर महाराज यांच्या 236 व्या पुण्यतिथीनिमित्त अंजनगाव येथील श्री समर्थ रामगीर महाराज देवस्थानात आयोजित 'लोकजागर' कार्यक्रमात त्यांनी भजनांच्या माध्यमातून प्रभावी समाजप्रबोधन केले. कार्यक्रमास पदाभिषिक्त मठाधिपती प्रसन्नगीर महाराज यांचे शिष्य नवनियुक्त मठाधिपती शंकरगिरी महाराज यांची उपस्थिती होती. यावेळी सहकलावंतांनी साथसंगत केली. कार्यक्रमाच्या शेवटी शंकरगिरी महाराज यांच्या हस्ते सर्व कलावंतांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शेकडो महिला-पुरुष नागरिक व तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## दुचाकी पार्किंगच्या वादातून एक जखमी

**अमरावती** – मोर्शी तहसीलमधील दापोरी येथील रहिवासी संदीप मधुकर अंधारे (47) मंगळवारी हिवरखेड येथील बाजारात आला होता. त्याने किशन देवराव पचारे यांच्या दुकानासमोर दुचाकी उभी केल्याने वाद निर्माण झाला.

# तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेत सृष्टी कोंडे प्रथम

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.19 )** – तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेत सृष्टी सतीशराव कोंडे हिने प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. सृष्टी ही डवरगाव येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा येथे इयत्ता पाचवीत शिक्षण घेत असून लहान वयातच तिने आपल्या कलेचा ठसा उमटवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती या शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर, अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, संचालिका प्रा.शुभांगी अभ्यंकर यांच्यासह सुषमा कोंडे, सतीश पुंडकर, जीवन फसाटे, गोरख पर्वतकर, सार्थक कोंडे, अनुष्का कोंडे, समर्थ अभ्यंकर व विहान अभ्यंकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी सृष्टीचे मन:पूर्वक अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक व कलात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अन्नपुर्णाबाई देवघरे यांचे निधन



**हिवरखेड** – येथील महिला गुरूदेव सेवा मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते नरेंद्र पंजाबराव देवघरे यांच्या मातोश्री अन्नपुर्णा पंजाबरावजी देवघरे यांचे दिनांक 15 डिसेंबर 2025 रोजी वयाचे 80 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मागे दोन मुले, तीन मुली, दोन सुना, जावई नातू व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# एफएसटी-व्हीएसटी-एसएसटी पथकांना प्रशिक्षण

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती( दि.19 )** – अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 पारदर्शक, निष्पक्ष व शांततापूर्ण वातावरणात पार पडावी, या उद्देशाने निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या एफएसटी (फ्लाइंग स्क्वॉड टीम), व्हीएसटी (व्हिडिओ सर्व्हेलन्स टीम) आणि एसएसटी (स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम) पथकांसाठी सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडला.

या प्रशिक्षण सत्रात निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी कशी करावी, यावर भर देण्यात आला. आचारसंहिता कक्ष प्रमुख राम लंके यांनी एफएसटीमार्फत निवडणूक कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तत्काळ दखल, घटनास्थळी भेट देऊन तपासणी, आवश्यक कारवाई व वेळेत अहवाल सादरीकरणाची प्रक्रिया स्पष्ट केली. व्हीएसटीमार्फत प्रचार सभा, मिरवणुका व अन्य हालचालींचे व्हिडिओ चित्रीकरण करून त्याचे दस्तऐवजीकरण व पुराव्याचे जतन करण्याच्या जबाबदाऱ्या सांगण्यात आल्या. तसेच एसएसटी पथकांनी ठराविक ठिकाणी स्थिरपणे कार्यरत राहून संशयास्पद हालचाली, रोख रक्कम, भेटवस्तू किंवा बेकायदेशीर प्रचार साहित्यावर लक्ष ठेवून कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आदर्श आचारसंहितेचा उद्देश निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे हा असून सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने, नि:पक्षपातीपणे काम करावे.

# पायांना नवे बळ, आयुष्याला नवी दिशा!

## 'उमेद पंख विश्वासाचे' उपक्रमाचा थाटात शुभारंभ

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.19 )**– शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या 127 व्या जयंतीचे औचित्य साधत 'उमेद पंख विश्वासाचे' या मानवतावादी उपक्रमाचा अमरावतीत भावनिक वातावरणात शुभारंभ झाला. विनामूल्य जयपूर फूट (कृत्रिम अवयव) वाटपाच्या या उपक्रमासाठी दिव्यांग बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने गर्दी केली. चालण्याचे स्वप्न पुन्हा साकार होणार असल्याने अनेकांच्या चेहऱ्यावर आशा, समाधान आणि आनंद स्पष्ट दिसत होता.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, आर्किटेक्ट रामेश्वर मणियार व अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 18 डिसेंबरपासून पंचवटी येथील वैद्यकीय महाविद्यालयात हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत कृत्रिम अवयव मिळविण्यासाठी व मोजमापासाठी तब्बल 800 दिव्यांगांनी नोंदणी केली आहे.

### समाजोपयोगी उपक्रमांचा निर्धार

बापूसाहेब देशमुख नागरवाडी यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रवीण तायडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात हर्षवर्धन देशमुख यांनी समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. सीईओ संजिता महापात्र यांनी हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून भविष्यात शासकीय व सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने अधिक प्रभावी काम करता येईल, असे सांगितले.



### उपक्रमाची ठळक वैशिष्ट्ये

- विनामूल्य जयपूर फूट (कृत्रिम अवयव) वाटप
- 800 दिव्यांगांची नोंदणी
- सामाजिक व शैक्षणिक संस्थांचा संयुक्त पुढाकार
- दिव्यांगांना आत्मनिर्भरतेकडे नेणारा प्रेरणादायी उपक्रम

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती ( दि. 19 )**– संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा घेण्यात आलेल्या उन्हाळी 2025 परीक्षेमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाचे आठ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून दोन विद्यार्थ्यांनी संपूर्ण विद्यापीठ यादीतून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय हे गुणवत्तेची खाण म्हणून ओळखले जाणारे विद्यापीठ क्षेत्रातील एकमेव विधी महाविद्यालय आहे. यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत आपला दबदबा कायम ठेवला आहे. एल.एल.एम या दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी परीक्षेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाची कुमारी विशाखा शेखर बिडवाई हिने संपूर्ण गुणवत्ता यादीत प्रथम स्थान पटकावले आहे.तर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत याच महाविद्यालयाची एलएलबी पाच वर्षीय अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी कुमारी साक्षी भरत कुपारेल हिने देखील प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. यासोबतच पाच वर्षीय अभ्यासक्रमाच्या कृणाली वासुदेव चालक हिने पाचवा क्रमांक, ऋषिकेश श्याम काळकर याने गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक तसेच आदित्य राघवेंद्र उपाध्याय याने विद्यापीठाचा गुणवत्ता यादीत दहावा क्रमांक प्राप्त केला आहे. एल.एल.बी तीन वर्षीय अभ्यासक्रमांमधून वैजयंतीराजे विश्वास काळे हिने गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक, शिल्पा राजू गुल्हाने हिने सातवा क्रमांक आणि योगेश रामकृष्ण सोळंके यांनी दहावा क्रमांक प्राप्त करत विद्यापीठ गुणवत्ता यादीत आपले स्थान प्राप्त केले.गुणवंत विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ वर्षा देशमुख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक



# बालांगण

## हान्सचा ख्रिसमस

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. जर्मनीमध्ये ब्रुकेनडॉर्फ नावाचे एक लहान गाव होते. त्या गावात हान्स नावाचा एक गरीब मुलगा राहत होता. त्याला कुणीही नव्हते. जे मिळेल ते खाऊन तो दिवस काढत असे. एका वर्षी ख्रिसमसच्या दिवसात प्रचंड थंडी पडली होती. हान्स कुडकुडत रस्त्यावरून फिरत होता. गावात सगळीकडे ख्रिसमसची तयारी चालू होती. लोक झाडे सजवत होते. रंगीत दिवे लावत होते. गोड पदार्थ बनवत होते. हान्सला खूप वाईट वाटत होते. कारण त्याच्याकडे काही नव्हते. अचानक त्याला गावातल्या चौकात एका आजोबा भेटले. ते होते सेंट निकोलस. ते हान्सला म्हणाले, हान्स, दु:खी होऊ नकोस. देव खूप दयाळू आहे. त्याचे तुझ्याकडे लक्ष आहे. तू इतरांना आनंद दिलास, तर देव तुलाही आनंद देईल.

हान्सने काही फळे गोळा केली. छोट्या मुलांना दिली. आजूबाजूच्या घरात



जाऊन लोकांना मदत केली. गमतीदार गोष्टी सांगून सर्वांना हसवलं. लोक त्याच्यावर खुश झाले. हान्सचे दु:ख दूर पळून गेले.

ख्रिसमसच्या दिवशी चर्चमध्ये प्रार्थना करून हान्स रात्री घरी आला. पाहतो तर काय ? तर त्याचे घर सुंदर सजवले होते. घरात झाडावर दिवे लावले होते. दारापाशी खाऊ आणि खेळणी ठेवली होती. सेंट निकोलसने आणि गावातल्या लोकांनी त्याला बक्षीस दिले होते.

**जर्मन लोककथा**

'आपण इतरांना मदत केली तर देव आपल्याला मदत करतो.' सेंट निकोलस म्हणाले. हान्सला खूप आनंद झाला. त्याला कळले होते की ख्रिसमस प्रेम, मदत आणि आनंद वाटण्याचा दिवस आहे. आजही ब्रुकेनडॉर्फसारख्या गावात ख्रिसमसच्या दिवशी लोक एकमेकांच्या घरात हळूच भेटवस्तू ठेवतात आणि आनंद साजरा करतात.

## बहुपयोगी लोह

खनिज म्हणजे पृथ्वीच्या आत नैसर्गिकरित्या तयार झालेले खास पदार्थ किंवा दगड. पृथ्वीच्या पोटात असलेल्या उष्णता, दाब आणि बदलांमुळे खनिजे तयार होतात. दगड फोडताना चमकणारे किंवा वेगळे दिसणारे तुकडे पाहून प्राचीन माणसांना खनिजांची ओळख झाली.

**माहिती खनिजांची**

हळूहळू त्यांना समजले, की ही खनिजे आग लावून किंवा घासून वेगवेगळ्या वस्तूंसाठी वापरता येतात. तेव्हापासून खनिजांचा शोध आणि वापर सुरू झाला.

लोखंड हे अत्यंत महत्वाचे, मजबूत, कठीण आणि पृथ्वीवरील सर्वात जास्त वापरले जाणारे खनिज आहे. त्याचे वैज्ञानिक नाव ऋ्श आहे. लोखंड जमिनीखाली मोठमोठ्या दगडांच्या रूपात आढळते. हे दगड खाणींतून मोठमोठी यंत्रे



वापरून बाहेर काढले जातात. भारतात लोखंडाच्या खाणी मुख्यतः ओडिशा, झारखंड, छत्तीसगड आणि कर्नाटक या राज्यांत आहेत.

साध्या परिस्थितीत लोखंड सहज विरघळत नाही.पण हवा, पाणी आणि मीठ यामुळे त्याला गंज लागू शकतो.

लोखंडावर प्रक्रिया केल्याशिवाय त्याचा उपयोग होत नाही. आजही काही ठिकाणी लहान साधने, लोखंडी खेळणी किंवा हातात धरायला सोपी वस्तू बनवण्यासाठी साध्या लोखंडाचा उपयोग केला जातो. भारतामध्ये लोखंड शुद्ध करून स्टील बनवण्यासाठी मोठे कारखाने आहेत. जमशेदपूर येथील टाटा स्टील हा भारतातील सर्वात जुना आणि मोठा स्टील कारखाना आहे.त्याशिवाय छत्तीसगड राज्यात भिलाई, ओडिशामधील रुरकेला, आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम आणि कर्नाटकातील भद्रावती हेही महत्त्वाचे लोखंड-स्टील कारखाने आहेत. खाणींतून मिळालेले लोहखनिज या कारखान्यांत तापवून आणि शुद्ध करून स्टील बनवले जाते. त्यानंतर ते गाड्या, पूल, घरे, मशीन, रेल्वे आणि अनेक दैनंदिन वस्तूंमध्ये वापरले जाते.जाते.

## प्राण्यांचं रंजक विश्व

मित्रांनो, पशुपक्ष्यांचं जीवन आपल्यापेक्षा कितीतरी वेगळं असतं. अनोखं असतं. हे जीव आपल्यापेक्षा



अगदी वेगळ्या पद्धतीनं जगतात, म्हणूनच त्यांच्या वेगळ्या जगण्याचा वेध घेणं, त्याबद्दल माहिती मिळवणं ही बाब रंजक आणि ज्ञान वाढवणारी ठरते. आकार-प्रकार, रंग-रूप या प्रत्येक बाबीत प्राणी एकमेकांपेक्षा वेगळे असतात. प्रत्येकाची वेगळी खासियत असते. चला, जाणून घेऊ या प्राणीजगतातल्या काही रंजक बाबी...

**चिवित्र विश्व**

* दक्षिण आफ्रिकेत आढळून येणाऱ्या एका प्रजातीतील बेडकांच्या शरीरात इतकं घातक विष असतं की त्यांना स्पर्श केला तरी माणूस मरू शकतो.

* आजूबाजूला डास असेल तर गुणगुण कानी पडते आणि आपण बेचैन होतो. हा आवाज नेमका कसा येतो हा एक प्रश्नच असतो. मुलांना हा आवाज असतो त्यांच्या पंख्यांच्या फडफडीचा. डासांचे पंख एका सेकंदात ५०० ते ६०० वेळा फडफडतात.

* चकोर हा पाकिस्तानचा राष्ट्रीय पक्षी आहे. याचं वैशिष्टय म्हणजे विषारी अन्न समोर ठेवताच त्याचे डोळे लाल होतात. विषारी अन्न पाहताच त्याचा मृत्यू होतो. म्हणूनच जुन्या काळात राजमहालात राजासाठी बनवण्यात येणारं अन्न विषरहित आहे की नाही हे तपासण्यासाठी या पक्ष्यांना पाळलं जात असे.

* चिंचुदरी एका रात्रीत जवळपास ३०० फुट जमीन खोदू शकते. *कुत्र्याची श्रवणक्षमता माणसापेक्षा नऊ पट जास्त असते.







## घडवा तुमचं व्यक्तिमत्त्व

मित्रांनो, अभ्यासासोबतच व्यक्तिमत्त्व विकासही तितकाच महत्त्वाचा असतो. शाळेत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा तुमच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात भरच घालत असतात. त्यामुळे अशा स्पर्धांमध्ये तुम्ही भाग घ्यायला हवा. गणपतीत तसंच दिवाळीतही सोसायट्यांमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. लहानग्यांसाठी वक्तृत्त्व, गायन, नृत्य, चर्चासत्र, विविध गुणदर्शनसारख्या स्पर्धांचं आयोजन केलेलं असतं. या स्पर्धांमध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता. सध्या आंतरशालेय स्पर्धांचीही धूम असते. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष तयारी करावी लागते. या स्पर्धांच्या निमित्ताने तुम्ही इतर शाळेतल्या मुलांना भेटू शकता. तुमच्या मित्र-मैत्रिणींची संख्या वाढू शकते.

**फन फॅक्टस**

आंतरशालेय वक्तृत्त्व, गायन, नृत्य, वादविवाद, बुद्धीबळ अशाही स्पर्धा घेतल्या जातात. निबंध स्पर्धांचंही आयोजन केलं जातं. यातून तुम्ही तुमचे विचार मांडू शकता. वादविवाद स्पर्धेत भाग घेतल्याने भांडण न करता स्वत:चा मुद्दा पटवून देण्याचं कौशल्य तुम्ही अंगी बाणवू शकता. वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेऊन तुम्ही स्टेजची भीती घालवू शकता. एखाद्या खेळात प्रवीण असाल तर शाळेच्या संघात सहभागी होऊ शकता. बॅडमिंटन, टेनिससारख्या खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकता. खो-खो, कबड्डीसारख्या खेळांसाठी शाळांचे संघ निवडले जातात. या संघांसाठीच्या निवड चाचणीत तुम्ही सहभागी होऊ शकता. अंगात चपळता असेल तर तुमची निवड होऊ शकेल. चित्रकला, हस्तकला येत असेल तर शालेय तसंच राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धांमध्ये सहभागी होता येईल. शाळेतर्फे एखादं मासिक निघत असेल तर त्यात तुम्ही लिखाण करू शकता. त्यामुळे अभ्यासासोबतच व्यक्तिमत्त्व



विकासावरही भर द्या आणि बक्षिसं मिळवण्याचा प्रयत्न नक्की करा.

## स्कँडीनेव्हियन्स माउंटेन रेंज

स्कँडीनेव्हियन्स माउंटेन रेंज ही युरोपमधील खूप सुंदर पर्वतश्रृंखला आहे. ही शृंखला नॉर्वे, स्वीडन आणि काही प्रमाणात फिनलंडमध्ये पसरलेली आहे. ही पर्वतश्रेणी खूप मोठी नाही पण खूप मजबूत आणि सुंदर आहे.नॉर्वे भागात जेंट्स्टिननहे सर्वात उंच शिखर सुमारे २,४६९ मीटर उंच आहे तर स्वीडनमध्ये केबनेका इस्क हे शिखर सुमारे २,०९७ मीटर उंच आहे. हिवाळ्यात या पर्वतांवर बर्फ असतो. उन्हाळ्यात हा बर्फ काही प्रमाणात वितळतो. स्कँडीनेव्हियन्स माउंटेन्समध्ये खूप खोल दऱ्या, नद्या आणि धबधबे आहेत. येथे पर्वतारोहण, स्कीइंग आणि हायकिंग करण्यासाठी उत्तम ठिकाणे आहेत. स्कँडीनेव्हियन्स माउंटेन रेंजमध्ये सांबार जातीची हरणे, लाल कोल्हे, बर्फातले उंदीर, मूस आणि वुल्फ या लांडग्यांच्या जाती आढळतात. तर गरुड आणि हॉर्न्‌ड आउल यासारखे काही पक्षी



दिसतात. नद्यांमध्ये सालमन, ट्राऊट यासारखे मासे आहेत. या पर्वतांमध्ये सामी हे आदिवासी लोक राहतात. ते मुख्यतः पशुपालन, विशेषतः रेनडियर पालन करतात. हिवाळ्यात ते झोपड्या आणि उबदार घरात राहतात. सामी लोक जेवायला मुख्यतः हरणाचे मांस, मासे, दूध आणि चीज खातात. उन्हाळ्यात ते जंगलातून फळे आणि बेरीज गोळा करतात.

**ओळख पर्वतांची**


सामी लोकांचे जेवण खूप साधे पण पौष्टिक असते. ते त्यांना थंडीत उब आणि ऊर्जा देतं. स्कँडीनेव्हियन्स माउंटेन्सचा निसर्ग आणि लोकसंस्कृती खूप खास आहे. प्राणी, पर्वत, बर्फ आणि आदिवासी लोकांचा सांस्कृतिक जीवन यामुळे हे ठिकाण साहसी प्रवाशांसाठी आणि अभ्यासकांसाठी खूप आकर्षक आहे.

## मुखवटे हत्तींचे

छोट्या दोस्तांनो, गणपती विसर्जनाला किंवा इतर आनंदसोहळ्या प्रसंगी खूप धमाल असते. या दिवशी तुम्ही हत्तीचे मुखवटे घालून फिरू शकता. हे मुखवटे घरच्या घरी तयार करता येतील. कसे करायचे हे मुखवटे? जाणून घेऊ या...

**साहित्य :**

मोठ्या आकाराच्या पेपर प्लेट, ग्रे रंग, ग्रे रंगाचा कार्ड पेपर, रंगीत कागद, सजावटीचं साहित्य, गम, बारीक इलॅस्टिक




**कृती :**

पेपरप्लेट घ्या. तिची मागची बाजू ग्रे रंगाने रंगवून घ्या. हा रंग वाळू द्या. रंग वाळल्यानंतर प्लेटच्या मध्यभागी डोळ्यांचा आकार कापून घ्या. ग्रे रंगाचा कार्ड पेपर घ्या. या कार्डपेपरपासून सोंडेचा आकार कापून घ्या. तसंच हत्तीचे कान कापून घ्या. भारतीय हत्तीचे कान छोट्या आकाराचे असतात. त्यामुळे कानांचा आकार छोटा असू द्या. आता ग्रे रंग दिलेली प्लेट घ्या. ही प्लेट म्हणजे हत्तीचं तोंड आहे. या प्लेटच्या दोन्ही बाजूंना कान चिकटवा. मध्यभागी सोंड चिकटवा. आता हत्तीचं तोंड तयार झालं. तुमच्याकडे असलेला रंगीत कागद घ्या. या कागदापासून त्रिकोण कापा. हा त्रिकोण हत्तीच्या डोक्यावर चिकटवायचा आहे. हा त्रिकोण म्हणजे झूल. या त्रिकोणावर मणी तसंच सजावटीच्या इतर वस्तू चिकटवता येतील. आता या पेपरप्लेटच्या दोन्ही बाजूंना छोटं भोक पाडा. त्यात इलॅस्टिक अडकवता येईल. हे मास्क घालून तुम्ही मिरवू शकता.

**करून तर पहा**

**ठिपके जुळवा**






## ओळखा पाहू...

**जिज्ञासा**


१) रक्ताभिसरण क्रियेचा शोध कोणी लावला?
२) राष्ट्रीय हक्क दिवस कधी असतो?
३) विजेचा सर्वात उत्तम वाहक कोण?
४) मौर्य काळातली प्रसिद्ध शैक्षणिक संस्था कोणती?
५) एनइएफटीचं पूर्णरूप काय?
६) सर्वात थंड ग्रह कोणता?
७) सर्वात छोटा खंड कोणता?
८) सर्वात मोठ्या पर्वतरांगा कोणत्या?
९) जगातला सर्वात उंच धबधबा कोणता?
१०) जगातलं सर्वात उंच धरण कोणतं?

उत्तर : १) विल्यम हार्वे २) १० डिसेंबर ३) चांदी ४) तक्षशिला ५) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ६) नेपच्यून ७) ऑस्ट्रेलिया ८) हिमालय ९) एंजल(व्हेनेझुएला) १०) जिनपिंग १ (चीन)

## फिटनेसच्या क्षेत्रात...

दोस्तांनो, सध्या सगळीकडेच फिटनेसबद्दल जागरूकता निर्माण झाली आहे. लोकांना आपलं आरोग्य टिकवून ठेवायचं आहे. म्हणूनच जीममध्ये जाणाऱ्यांची, डाएट करणाऱ्यांची अजिबात कमतरता नाही. त्यामुळे फिटनेस ट्रेनरना सर्वत्र भरपूर मागणी आहे. या क्षेत्रात तुम्ही उत्तम करीअर घडवू शकता.

फिटनेस ट्रेनर बनण्यासाठी तुम्हाला स्वत:ला फिटनेसची विशेष आवड असणं गरजेचं आहे. तुम्हाला फिटनेसचं महत्त्व असायला हवं. फिटनेस ट्रेनर बनण्यासाठी विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची गरज असतेच असं नाही पण फिटनेसबाबतचे काही अभ्यासक्रम तुम्ही करू शकता. इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस सायन्स, नवी दिल्ली, लक्ष्मीबाई नॅशनल कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यासारख्या संस्थांमधून शारीरिक शिक्षणासंबंधीचे अभ्यासक्रम तुम्ही पूर्ण करू शकता. यासह फिटनेसविषयक अभ्यासक्रम



शिकवणाऱ्या अनेक संस्था देशात आहेत. डाएट अँड न्यूट्रिशनचा अभ्यासक्रमही तुम्ही करू शकता. या क्षेत्राचा सखोल अभ्यास करण्याची तयारी असेल तर पीएचडीही करता येईल.

या क्षेत्रात संधींची अजिबात कमतरता नाही. फिटनेसचं क्षेत्र झपाट्याने विस्तारत आहे. त्यातच शहरी भागात जीवनशैलीशी संबंधित विकारांच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्याकडे लक्ष देण्याचं प्रमाण बरंच वाढताना दिसत आहे. तरूणांमध्येही फिटनेसबाबत जागरूकता वाढताना दिसते आहे. सरकारी तसंच खाजगी क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळू शकतात. पुरेशा अनुभवानंतर तुम्ही स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकता. वैयक्तिक सल्लागार म्हणूनही काम करता येईल. फिटनेस ट्रेनर म्हणून तुम्ही वेगवेगळ्या भूमिका पार पाडू शकता.

**कोण होणार ?**

**खादाडी**

### नूडल ॲण्ड चीझ

सणासुदीला गोड गोड खाऊन कंटाळा येतो. काही तरी चमचमीत खावंसं वाटतं. अशा वेळी तुम्ही नूडल्स विथ चीज ही रेसिपी बनवू शकता. यासाठी एक कप नूडल्स घ्या. एक कप दूध, मीठ आणि मीरपूड आणि चीझ असे पदार्थ घ्या. नूडल्स शिजवून घ्या. पाणी काढून टाका. एका कढईत दूध घाला. गरम झाल्यानंतर त्यात चीज घालून गरम करा. यात नूडल्स घाला. वरून मीठ आणि मिरपूड घाला आणि मस्तपैकी खा.



**टेक ग्यान**

### मोबाईल चार्ज करताना

दोस्तांनो, तुम्ही लॅपटॉपला वायर जोडून मोबाईल चार्ज करता का? ही चुकीची पद्धत आहे. अशा प्रकारे मोबाईल चार्ज केला तर त्यातली माहिती हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा प्रकारे मोबाईल चार्ज करण्याआधी थोडा विचार करा.



**दोस्त हे मस्त**

### भेटा टकिनला

मित्रांनो, प्रत्येक देशाचा एक राष्ट्रीय प्राणी असतो. टकिन हा भूतानचा राष्ट्रीय प्राणी आहे. टकिन हा बकऱ्यांच्या प्रजातीचा प्राणी आहे. हे प्राणी साधारण २० जणांच्या कळपात राहतात. उन्हाळ्यात ३०० जणांचा कपळही तयार होतो. टकिन डोंगराळ तसंच गवताळ भागात आढळतो. अरूणाचल प्रदेश तसंच चीनमध्येही टकिन आढळतो. शिकार आणि अधिवासाची कमतरता यामुळे टकिनची संख्या कमी कमी होताना दिसत आहे. त्यांचं संरक्षण करणं गरजेचं झालं आहे.



**समाजभान**

### बी इको फ्रेंडली

दोस्तांनो, सण-उत्सवांचा आनंद लुटताना पर्यावरणाचं भान राखणंही गरजेचं आहे. गणपतीत तुम्ही पर्यावरणाचा जागर केला. आता येणाऱ्या उत्सवांमध्येही अशी काळजी घेता येईल. दिवाळीत तुम्ही कमी फटाके फोडू शकता. नवरात्रीत लाउडस्पीकरचा आवाज कमी ठेऊ शकता. गणपतीचं निर्माल्य कलशात टाकण्याचा निर्धार करा. अशा प्रकारे सण-उत्सव साजरे करताना पर्यायवणाचं भान राखलं जाईल.



# अपघातात पत्नी, पुत्री ठार पती गंभीर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि.१९ :**
पती पत्नी आणि त्यांच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या चिमुकली असा ह्यत्यांचाह्न सुखी त्रिकोणी संसार. हे तिघे जन हसत खेळत दुचाकीने खामगाव कडे जात असताना त्यांच्यावर अपघातरूपी काळाने घाला घातला. काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले आणि त्यांच्या संसाराचा डाव अर्ध्यावर मोडला.

राष्ट्रीय महामार्गवरील खामगाव ते नांदुरा मार्गावर झालेल्या भीषण अपघातात या माय लेकी जागीच ठार झाल्या तर पती गंभीर जखमी झाला. नांदुरा ते खामगाव मार्गावरील आमसरी फाट्याजवळ गुरुवारी संध्याकाळी हा अपघात घडला. आमसरी फाट्यासमोरून भरधाव वेगात आलेल्या अज्ञात मालवाहू वाहनाने (ट्रकने) दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत दुचाकीवरील शीतल दिलीप बोंबटकर (वय ३०) त्यांची चिमुकली मुलगी श्रावणी दिलीप बोंबटकर( वय ३) यांचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्घटनेत दुचाकीचालक पती दिलीप प्रभाकर बोंबटकर (वय ३५) हे गंभीर जखमी झाले असले तरी सुदैवाने बचावले. अपघात इतका भीषण होता की आई-लेकीने घटनास्थळीच प्राण सोडले. बोंबटकर परिवार निमगावजवळील नारायणपूर येथील रहिवासी आहे. अपघातानंतर आरोपी मालवाहू वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला.

घटनेची माहिती मिळताच जलंब पोलीस ठाण्याचे ठाणेदार, पोलीस कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटना स्थळाचा पंचनामा केला फरार ट्रकचालकाची अन्य पोलीस ठाण्याना माहिती दिली. फरार चालकाचा शोध सुरू आहे. ओम साई फॉउंडेशचे विलास निंबाळकर, अश्विन फेरण, गणेश वनारे यांनी रुग्णवाहिका द्वारे जखमी युवक व दोघींचे मृतदेह रुग्णालयात नेले. घटनेची माहिती मिळताच नारायणपूर येथे एकच आकांत उसळला.

# शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची तीन लाख पदे रिक्त

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
राज्यात बेरोजगार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना, दुसरीकडे राज्य शासनाच्या विविध विभागांतील शासकीय नोकऱ्यांमधील रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र समोर आले आहे. राज्यातील विविध शासकीय खात्यांमध्ये एकूण दोन लाख ९९ हजार ५१ पदे रिक्त आहेत.

राज्य शासनाच्या विविध खात्यांमध्ये आठ लाख १८ हजार ५०३ पदे मंजूर आहेत. यापैकी दोन लाख ९९ हजार ५१ पदे रिक्त असून ही संख्या एकूण मंजूर पदांच्या ३६.५४ टक्के इतकी आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने प्रशासनावर तसेच कार्यरत अधिकारी-कर्मचाऱ्यांवर मोठा ताण येत असल्याचे वास्तव आहे.

नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात शेतकरी कामगार पक्षाचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर सरकारतर्फे देण्यात आलेल्या लेखी उत्तरात सध्या राज्यात दोन लाख ९९ हजार ५१ पदे रिक्त आहेत.

तसेच शासनाने ऑगस्ट २०२२ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत शासकीय, निमशासकीय तसेच अनुकंपा तत्त्वावर एकूण एक लाख २० हजार २३२ नियुक्त्या केल्या असल्याची माहिती देण्यात आली.

शासनातील विहित पदांवरील भरती ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून, नवीन पदनिर्मिती किंवा सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदांवर पदोन्नती व सरळसेवा भरतीद्वारे संबंधित प्रशासकीय विभागांकडून नियुक्त्या केल्या जात असल्याचे या निवेदनात मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.



राज्यात बेरोजगारीचा दर दिवसेंदिवस वाढत चालला असून, त्याचवेळी शासकीय विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याचे चित्र आहे.

विविध विभागांत अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता असतानाही कायमस्वरूपी भरती प्रक्रिया राबवण्यात राज्य सरकारकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप होत आहे. यामुळे सुशिक्षित तरुणांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

राज्य सरकारने गेल्या काही वर्षांत कंत्राटी पद्धतीने भरती करण्यावर अधिक भर दिला आहे. आरोग्य, शिक्षण, महसूल, सार्वजनिक बांधकाम आदी महत्त्वाच्या विभागांमध्येही कंत्राटी कर्मचाऱ्यांवर कामकाज चालवले जात आहे. या धोरणामुळे सरकारवर आर्थिक भार कमी होतो, असा दावा केला जात असला तरी यामुळे रोजगाराची सुरक्षितता आणि सेवांची गुणवत्ता यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना कमी वेतन, अपऱ्या सुविधा आणि नोकरीची अनिश्चितता सहन करावी लागत आहे. दुसरीकडे, स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेले अनेक उमेदवार नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. राज्य सरकारचे नेमके रोजगार धोरण काय आहे, असा सवाल विरोधकांसह विविध संघटनांकडून उपस्थित केला जात आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी कायमस्वरूपी भरती प्रक्रिया तातडीने राबवावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## फडणवीस यांच्या नागपुरात
# शिंदे सेनेला हव्यात ५० जागा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
नागपूर महापालिकेची निवडणूक भाजप -शिंदे गटासोबत युती करून लढणार असल्याचे संकेत यापूर्वी भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने शिवसेना शिंदे गटाचे आमदार कृपाल तुमाने यांनी भाजपचे नागपूर महापालिका निवडणूक प्रभारी आमदार प्रवीम दटके, प्रा. अनिल सोले. आ. गिरीश व्यास यांची शुक्रवारी भेट घेतली व त्यांच्यासोबत जागा वाटपाबाबत चर्चा केली.

यावेळी किरण पांडव, जिल्हा प्रमुख सुरज गोजे उपस्थित होते. कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी ठेवून ही निवडणूक लढवण्याबाबत दोन्ही पक्ष सकारात्मक आहे, असे तुमाने यांनी सांगितले.



# नवी मुंबई - नागपूरसाठी थेट विमान

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नुकतेच लोकार्पण झाले असून त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर नागपूर आणि मुंबईदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या २५ डिसेंबरपासून नवी मुंबई विमानतळावरून नागपूरसाठी थेट विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे.

## लोकसभेप्रमाणे ज्येष्ठ, अपंगांसाठी
# घरपोच मतदानाचा अधिकार का नाही?

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
महापालिका निवडणुकीत ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक तसेच अपंग मतदारांसाठी विधानसभा व लोकसभा निवडणुकांच्या धर्तीवर घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केली. मात्र, याबाबत राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप स्पष्ट निर्देश प्राप्त झाले नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

महापालिका आयुक्त अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी बैठक झाली. बैठकीदरम्यान विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आपल्या भूमिका मांडली. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व अपंग मतदारांना घरपोच मतदानाची सुविधा देण्यात आली होती.

या सुविधेमुळे मतदानाचा टक्का वाढण्यास मदत झाली असून, वृद्ध आणि अपंग मतदारांना मतदान केंद्रांपर्यंत जाण्याचा शारीरिक त्रास टळला होता. हीच व्यवस्था महापालिका निवडणुकीतही लागू करण्यात यावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.



माजी नगरसेवक नरेंद्र बोरकर, संदीप जाधव आणि संजय बंगाले यांच्यासह उपस्थित राजकीय नेत्यांनी अनेक ज्येष्ठ नागरिक आरोग्यविषयक कारणांमुळे घराबाहेर पडू शकत नाहीत, असे निदर्शनास आणून दिले. यासंदर्भात महापालिका आयुक्त अभिजीत चौधरी म्हणाले की, नागपूर महापालिका ही राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच काम करते. आयोगाकडून अधिकृत आदेश किंवा सूचना प्राप्त झाल्याशिवाय महापालिका प्रशासन स्वतःहून असा निर्णय घेऊ शकत नाही.

तथापि, राजकीय पक्षांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत प्रशासन आयोगाकडे औपचारिक प्रस्ताव सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले. ही बैठक महापालिका निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी तसेच आदर्श आचारसंहितेच्या कडक अंमलबजावणीबाबत राजकीय पक्षांना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

# उज्ज्वल निकम यांना हटवण्याची मागणी

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. १९ :**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी सुरू झाली असून सहकारी सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांच्याकडून या सुनावणीच्या वेळी युक्तिवाद करण्यात आला. सुनावणीसाठी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख उपस्थित होते.

संतोष देशमुख हत्या प्रकरण

बीड न्यायालयात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या सुनावणीला सुरुवात झाली असून, सरकारी पक्षाच्या वतीने वकील बाळासाहेब कोल्हे यांनी सुरुवातीचा युक्तिवाद मांडला. मात्र त्यानंतर वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे वगळता इतर आरोपींनी सरकारी वकील उज्ज्वल निकम हे राजकीय पक्षाशी संबंधित असल्याचे कारण देत त्यांना या खटल्यातून बाजूला करावे, असा अर्ज न्यायालयात सादर केल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी क्रमांक २ विष्णू चाटेच्या जामीन अर्जावर युक्तिवाद झाला. विष्णू चाटेचे सुरुवातीच्या दोन एफआयआरमध्ये नाव नाही तसेच या पूर्वी त्याच्यावर कोणता गुन्हा नसल्याचा युक्तिवाद वकिलांनी केला. तर विष्णू चाटेकडून वारंवार आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे खंडणीची मागणी करण्यात आली असल्याचा युक्तिवाद सरकारी पक्षाच्या वकिलांनी केला आहे. तसेच विष्णू चाटे हा सुरुवातीपासूनच गुन्ह्यात सक्रिय असल्याचे सरकारी पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यान सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्यावर झालेल्या आरोपांना त्यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. न्यायाधीशांनी अजार्बाबत माहिती दिल्यानंतर, निकम यांनी आपले म्हणणे मांडत हा अर्ज फेटाळण्याची मागणी न्यायालयाकडे केली. याच दरम्यान, जेव्हा न्यायाधीशांनी सुदर्शन घुले या आरोपीचे नाव पुकारले, तेव्हा तो अचानक न्यायालयात चक्कर येऊन पडला.

## वाहन मुक्त करण्यासाठी दंड आकारण्याचा
# तहसीलदारांना अधिकार नाही

■ **महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. १९ :**
अवैध गौणखनिज वाहतुकीसाठी जप्त करण्यात आलेली वाहने मुक्त करताना दंड आकारण्याचा अधिकार तहसीलदारांना नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. तसेच आकारण्यात आलेला दंड न्यायालयाने रद्द ठरवला.

न्यायमूर्ती एम.डब्ल्यू. चंदवानी यांनी दिलेल्या या निर्णयामुळे तहसीलदारांनी अधिकाराबाहेर जाऊन आकारलेले दंड रद्द करण्यात आले. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील कलम ४८ (८) (२) नुसार अवैध गौणखनिज वाहतुकीसाठी वापरलेली वाहने जप्तीमधून मुक्त करण्यासाठी दंड आकारण्याचा अधिकार केवळ जिल्हाधिकारी किंवा त्यांनी अधिकार बहाल केलेले उपजिल्हाधिकारी किंवा त्या श्रेणीवरील अधिकाऱ्यांनाच आहे. तहसीलदारांना असा अधिकार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने यापूर्वी न्यायमूर्ती पराग दिवाळे यांनी दिलेल्या आदेशानुसार सिंदखेड राजाच्या तहसीलदारांच्या नावे जमा करण्यात आलेल्या एक लाख रुपयांच्या ठेवीतून १६,५०० रुपये वजा करून उर्वरित रक्कम संबंधित वाहनधारकाला परत करण्याचे निर्देश दिले.

## हनीट्रॅपद्वारे खंडणी उकळण्याचा धंदा
# नागपुरात टोळी जेरबंद

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
नागपुरात हनीट्रॅपच्या माध्यमातून नागरिकांना अडकवून कोट्यवधींची खंडणी उकळणारी टोळी सक्रिय आहे. या प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

अश्विन (वय ३९, रा. अजनी, नागपूर), नितीन (वय ३८, रा. अजनी, नागपूर), कुणाल (वय ४२, रा. अजनी, नागपूर), रितेश उर्फ पप्पु (वय ४१, रा. हुडकेश्वर, नागपूर), आशिष (वय ३६, रा. गोंदिया), अविनाश वय ३५, रा. जि. गोंदिया), रविकांत (रा. नागपूर) यांच्यासह ४ महिला आरोपींचा देखील या गुन्ह्यात सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणात ७ पुरुष आरोपींसह ४ महिला आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, एका ६२ वर्षीय सुज्ञ नागरिकाकडून खंडणी उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. माहितीनुसार तहसिल पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या फिर्यादीस ५ सप्टेंबर ते १८ डिसेंबर २०२५ दरम्यानच्या कालावधीत हनीट्रॅपमध्ये अडकवण्यात आले. खाजगी चित्रीकरण करून ते सार्वजनिक करण्याची धमकी देत आरोपींनी फिर्यादीकडून ऑनलाईन व रोख स्वरूपात १ लाख ७८ हजार रुपये उकळले. त्यानंतर तब्बल २ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली.

तडजोडीअंती ६० लाख रुपये देण्याचे ठरले होते. सहायक पोलीस आयुक्त अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा- घरफोडी विरोधी पथकाने सापळा रचत १८ डिसेंबर २०२५ रोजी एका हॉटेलमध्ये कारवाई केली.

आरोपींपैकी तिघांनी ६० लाख रुपयांची मागणी करताच पोलिसांनी त्यांना रंगेहाथ ताब्यात घेतले. चौकशीनंतर उर्वरित आरोपींनाही अटक करण्यात आली. कारवाईदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम व विविध कंपनीचे मोबाईल असा एकूण १ लाख ५६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींना पुढील तपासासाठी तहसिल पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाईत पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल, सह. पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. दरम्यान या प्रकरणात या टोळीने आणखी किती लोकांना हनीट्रॅपमध्ये अडवले हे पुढे येण्याची शक्यता आहे.

## नवी मुंबई विमानतळाला नरेंद्र मोदींचे नाव?
# खपवून घेणार नाही : काँग्रेसचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ :**
नवी मुंबई विमानतळाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव देण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख सध्या एनएम विमानतळ म्हणून केला जात आहे. विमानतळाच्या कुंपनाच्या भिंतीवरही एनएम अक्षरे कोरली जात आहेत. त्यामुळे हे एनएम म्हणजे नरेंद्र मोदी विमानतळ असे तर नाही ना असा दाट संशय बळावत चालला आहे, असे त्यांनी म्हटले आहे. सपकाळ यांनी सातारा ड्रग्ज प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, नवी मुंबईच्या विकासासाठी स्थानिकांनी जमिनी दिल्या व त्यावेळी भूमीपुत्राच्या हक्कांसाठी दि. बा. पाटील यांनी दिर्घ लढा दिला.

१२.५ टक्के योजना ही दि. बा. पाटील यांच्या आंदोलनामुळेच शक्य झाली आहे. दि. बा. पाटील यांची आमदार व खासदार अशी प्रदिर्घ राजकीय कारकिर्द राहिली आहे. नवी मुंबईत, जेएनपीटी, नैना प्रकल्प, नवी मुंबई विमानतळ विकसित होत असताना भूमिपुत्रांनी दिलेल्या योगदानाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी रास्त आहे. सरकारने जनभावनेचा आदर केलाच पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरी दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचे आश्वासन दिले असले तरी त्यांचा कावा सर्वांना माहिती आहे. फडणवीसांचा कावा ना कळे ब्रम्हदेवा, असा आहे, असे सपकाळ म्हणाले.

**विमानतळाच्या भिंतींवर एनएम अक्षरे कोरली**

ते पुढे म्हणाले, नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख सध्या एनएम विमानतळ असा केला जात आहे. विमानतळाच्या कुंपनाच्या भिंतीवरही एनएम अक्षरे कोरली जात आहेत. हे एनएम म्हणजे नरेंद्र मोदी विमानतळ असे तर नाही ना असा दाट संशय बळावत चालला आहे.

अहमबादच्या क्रिकेट स्टेडियमचे सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव बदलून नरेंद्र मोदी यांचे दिले आहे, पण असा कोणताही कावेबाज पणा भाजपा वा देवेंद्र फडणवीस यांनी करु नये. लोकसभेत काँग्रेसच्या खासदारांनी या प्रश्नी आवाज उठवला आहे, राज्यसभेतही ही मागणी लावून धरली जाईल.

भाजपा महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाणीवपूर्वक दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास टाळाटाळ करत आहेत, परंतु कोणत्याही परिस्थितीत दुसरे नाव खपवून घेतले जाणार नाही, वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून लढा देऊ, कोणाचीही तमा बाळगणार नाही, असा इशाराही सपकाळ यांनी यावेळी दिला.

# विदर्भात गोंदियाचे तापमान निच्चांकी ८.० अंश सेल्सिअसवर

■ **महासागर प्रतिनिधी**
**गोंदिया, दि. १९ :**
जिल्ह्यात थंडीची लाट सुरूच आहे, गेल्या १० दिवसांपासून जिल्ह्याचे किमान तापमान ८ ते ९ अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

१९ डिसेंबर रोजी जिल्ह्यात किमान तापमान ८.० अंश सेल्सिअस नोंदवले. जे विदभार्तील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वात कमी होते. मैदानी भागात थंडीची लाट अधिक तीव्र होती. काही दिवसांपूर्वी जिल्ह्याचे किमान तापमान ८ अंश सेल्सिअसवरून १० ते १२ अंश सेल्सिअसपर्यंत वाढले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे. यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना थंडीपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला होता. परंतु उत्तरेकडून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे थंडीचा जोर वाढला. डोंगरांवर बर्फवृष्टीचा फटका गोंदिया जिल्ह्यातील नागरिकांना बसत आहे. थंड वाऱ्यांमुळे शहर आणि ग्रामीण भागातील रस्त्यांवर अघोषित संचारबंदी सारखे चित्र निर्माण झाले आहे. मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्यांची संख्याही लक्षणीय रित्या कमी झाली आहे.



शुक्रवार १९ डिसेंबर रोजी अकोला १०.४ अंशा, अमरावती ९.८, भंडारा १०.०, बुलढाणा १२ , ब्रह्मपुरीत ११.२, चंद्रपूर १२.२, गडचिरोली १०.६ असे तापमान नोंदविण्यात आले.

# आ. डॉ. मिलिंद नोरोटे यांनी घेतली सुवर्णकन्या श्वेताच्या प्रशिक्षणाची जबाबदारी

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. १९ :**
दुबई येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन पॅरा गेम्समध्ये तिरंदाजी स्पर्धेत वैयक्तिक सुवर्ण आणि सांघिक कांस्यपदक पटकावत भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावणाऱ्या श्वेता कोवे हिचा यापुढील संपूर्ण प्रशिक्षण खर्च आमदार डॉ. मिलिंद नोरोटे उचलणार आहेत. त्यामुळे भविष्यात ऑलम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे श्वेताचे स्वप्न पूर्ण होण्यास मोठी मदत होणार आहे.

आज, १९ डिसेंबर रोजी गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी श्वेता कोवे हिचा काढोली येथे घरी जाऊन सत्कार केला. यावेळी नरोटे म्हणाले की, दिव्यांगत्वावर मात करत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभी राहिलेली श्वेताची यशोगाथा केवळ गडचिरोलीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी ठरत आहे. एका छोट्याशा ग्रामीण गावातून जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचण्याचा तिचा संघर्ष, जिद्द आणि मेहनत आज नव्या पिढीसमोर आदर्श ठरत आहे.



या ऐतिहासिक यशानंतरही श्वेताचा प्रवास इथेच थांबू नये, तर तिने भविष्यात ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करावे, त्यासाठी श्वेताच्या पुढील उच्च दर्जाच्या प्रशिक्षणासाठी आणि तयारीसाठी लागणारा संपूर्ण खर्च आपण वैयक्तिकरीत्या उचलणार असल्याची त्यांनी जाहीर घोषणा केली.

आर्थिक अडचणी कधीही तिच्या स्वप्नांच्या आड येऊ नयेत, यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे तर एक जबाबदार समाजघटक म्हणून आपण श्वेताच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील अशा हिऱ्यांना योग्य संधी आणि पाठबळ मिळाले, तर ते जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल करू शकतात, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, भाजपाचे जेष्ठ नेते रमेश भुरसे, नरेश अलसावार, नीरज रामानुजनवार, विनोद भोयर, कुसनराम, भारत खडेसर, सरपंच जितेंद्र हुलके, सलील इजमनकर, मोरेश्वर चरडे, शरद अलगमकार, प्राचार्य संजय फुलझेले, किशोर पाचभाई सर, सुशील अवसरमोल सर, रामदास हुलके, गोविंदा धानोरकर, बबलू टेमरे, दिपक मोहुर्ले, माजी सरपंच बेबीताई बुराडे, राजनाथ ऊसवाजी आणि येमडवार उपस्थित होते.